७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
शनिवार, दि. ०६ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये


# मराठा समाजाला ८ योजनांमध्ये सवलती

**फडणवीस सरकारचा मोठा निर्णय**

**मुंबई (दै. संध्या)**



मराठा समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी फडणवीस सरकारनं एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. आता इतर मागासवर्गीय समाजाप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनानं घेतला आहे.

शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार, ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल 8 विशेष योजना सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे मराठा समाजातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. या महत्त्वपूर्ण योजना नेमक्या कोणत्या आहेत, त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात सक्षम करण्यासाठी शासनाने लागू केलेल्या योजनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती : दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना आता मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांनाही लागू होईल.

वाहन चालक व वाहक प्रशिक्षण : मराठा समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना सुरू करण्यात येणार आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती : इयत्ता 9 वी ते 12 वीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली विशेष शिष्यवृत्ती योजना मराठा प्रवर्गासाठी विस्तारित करण्यात आली आहे.

शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती : विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर 16 बाबींबाबतच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती (Reimbursement) थेट शासनाकडून करण्याची योजना यात समाविष्ट आहे.

परराज्यातील शिक्षणासाठी सवलत : महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे, परंतु परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मराठा उमेदवारांना या योजनेचा लाभ घेता येईल.

इतर मागासवर्गीय (OBC) विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा मिळण्यासाठी पात्र असलेल्या सर्व घटकांचा अभ्यास आता मराठा समाजासाठी खुला करण्यात आला आहे. सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आता मराठा समाजातील विद्यार्थी पूर्णपणे पात्र धरले जातील.

रिक्त जागांवर प्रवेश घेणाऱ्यांनाही लाभ : केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांमध्ये रिक्त राहिलेल्या जागांवर, प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावरील (Institutional Level) जागांवर प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शैक्षणिक सवलती लागू करण्यात येणार आहेत.

भविष्यात इतर मागास प्रवर्गास (OBC) ज्या काही नवीन शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा लागू करण्यात येतील, त्या सर्व सवलती पुढील कोणत्याही नवीन आदेशाची वाट न पाहता मराठा समाजास आपोआप लागू होतील, अशी अत्यंत महत्त्वाची तरतूदही या निर्णयात करण्यात आली आहे.

# MPSC उमेदवारांसाठी खास 'निपूण सेतू'

## UPSC च्या प्रतिभा सेतूच्या धर्तीवर निर्णय

**मुंबई (दै. संध्या)**




■ अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्यांना होणार फायदा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) प्रतिभा सेतूच्या धर्तीवर निपूण सेतू उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामुळे अंतिम निवड यादीत शिफारस न झालेल्या उमेदवारांना सेवेची संधी मिळणार आहे. यासंबंधीचा शासन निर्णय आज जारी झाला. शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात. सदर परीक्षांमध्ये मोठ्या संख्येने उमेदवार पात्र ठरत असले तरी उपलब्ध पदसंख्या मर्यादित असल्यामुळे अंतिम निवडीसाठी केवळ काही उमेदवारांचीच शिफारस केली जाते. परिणामी, अनेक गुणवंत व सक्षम उमेदवारांकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता, स्पर्धात्मक परीक्षांमधून विकसित झालेली विश्लेषणक्षमता, नेतृत्वगुण तसेच सार्वजनिक सेवा करण्याची मानसिकता असूनदेखील त्यांना अपेक्षित रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) मुलाखत फेरीपर्यंत पात्र ठरलेल्या परंतु अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांसाठी "प्रतिभा सेतू" पोर्टल विकसित केले आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) विविध परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत (मुलाखत / कौशल्य चाचणी) पोहोचूनही अंतिम निवड यादीत स्थान मिळवू न शकलेल्या राज्यातील गुणवंत उमेदवारांच्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा लाभ राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासासाठी करून घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने उमेदवारांचे तपशील सार्वजनिक तसेच विशेषतः महाराष्ट्रातील खाजगी क्षेत्रातील संभाव्य नियोक्त्यांना आणि उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी, उद्योग विभागामार्फत विकसित केलेल्या एक खिडकी 'मैत्री २.०' (MAITRI २.०) पोर्टल अंतर्गत "निपुण सेतू" हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

# NEET प्रकरणातील मनीषा वाघमारे व्हर्टिगो आजाराने ग्रस्त

**पुणे/दिल्ली (दै. संध्या)**



■ वकिलांकडून जामीन अर्ज दाखल; न्यायालयाने निर्णय राखून ठेवला

देशभरात नीट पेपरफुटी प्रकरणाने एकच खळबळ उडाली होती. यात अनेकांना अटक करण्यात आली असून सध्या दिल्लीतील न्यायालयात सुनावणी सुरू आहे. यातील एक आरोपी महिला मनीषा वाघमारेच्या जामीन अर्जावर दिल्लीच्या राऊज एव्हेन्यू कोर्टाने आपला निर्णय राखून ठेवला आहे. या जामीन अर्जावर आता 9 जून रोजी अंतिम निर्णयाची सुनावणी होणार आहे. शुक्रवारी झालेल्या सुनावणीत कोर्टाने तसेच सीबीआयने मनीषा वाघमारेच्या जामीनाला तीव्र विरोध दर्शवला आहे. मनीषा वाघमारेचा जामीन अर्ज दाखल करण्यात आल्यानंतर, या प्रकरणाचा तपास अजूनही सुरू आहे आणि अनेक गोष्टी प्रलंबित आहेत, अशा परिस्थितीत तुम्ही इतक्या घाईत जामीन अर्ज का दाखल केला? असा सवाल न्यायाधीश अजय गुप्ता यांनी आरोपीच्या वकिलांना केला. यावर उत्तर देताना वाघमारेच्या वकिलांनी सांगितले की, सीबीआयच्या तपासात आतापर्यंत आमच्याविरोधात कोणताही ठोस पुरावा सापडलेला नाही. तसेच वाघमारे या सर्टिफाइड एज्युकेशन काउन्सिलर असून, त्यांना समुपदेशन फी नियमितपणे मिळत असते, असा दावा वकिलांनी केला. तसेच पुढील युक्तीवाद करताना सीबीआयच्या 3.50 लाख रुपयांच्या संशयास्पद बँक एंट्रीचा उल्लेख करत मनीषा वाघमारेच्या वकिलांनी म्हटले की, ते पैसे वाघमारेला तिच्या पूर्वजांच्या मालमत्तेच्या 'गिफ्ट डीड'मधून आले होते. तसेच त्यांच्या बँक खात्यात कोणताही संशयास्पद व्यवहार नाही आणि सीबीआयने दोनदा घराची झडती घेऊनही कोणतीही रोख रक्कम जप्त केलेली नाही. त्यामुळे तुरुंगात ठेवणे अयोग्य असल्याचे वकिलांनी म्हटले आहे.

# शिवसेना शिंदे गटाचे २ उमेदवार बिनविरोध

**मुंबई (दै. संध्या)**



■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले- ही पुढील विजयाची नांदी

■ मविआवर जोरदार टोलेबाजी

■ महाविकास आघाडीची बिघाडी पाहायला मिळाली

महाराष्ट्रात विधान परिषदेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकीत अर्ज भरण्याच्या दिवशी महायुतीमधील घटक पक्षांमध्ये अंतर्गत मतभेद तसेच बंडखोरी देखील पाहायला मिळाली. मात्र, अर्ज माघारीच्या वेळेस अनेकांनी अर्ज मागे घेतले आहेत. शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्यातील अंतर्गत वाद छत्रपती संभाजीनगर येथे पाहायला मिळाला. मात्र ती जागा भाजपला सोडण्यात आली. त्यानंतर ठाण्यात शिंदे गटाचा उमेदवार बिनविरोध झाला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, सर्व मतदारांना मी धन्यवाद देतो. ठाणे पालघर विधान परिषदेतल्या मतदारांनी ही निवडणूक बिनविरोध केली. उमेदवारांनाही धन्यवाद देतो. ठाण्यात निवडणूक बिनविरोध झाली आणि ठाण्यात विजयाचे फाटक बिनविरोध उघडले. निवडणूक झाली असती तरी बहुमत आमचेच होते. ठाणे पालघर विधान परिषद आणि यवतमाळ विधान परिषद दुष्यंत चतुर्वेदी हे देखील निवडून आले आहेत. शिवसेनेचे 2 बिनविरोध आहे, भाजपचे 2 आणि राष्ट्रवादी अजितदादा गटाचे 2 बिनविरोध आले. म्हणजे 6 बिनविरोध आले. ही पुढील विजयाची नांदी आहे. जळगाव आणि नाशिक चर्चेअंती तिथे देखील बिनविरोध होऊ शकतात.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, महाराष्ट्रातील सर्व 17 जागा महायुती जिंकेल असे मी यापूर्वी देखील सांगितले होते. महाविकास आघाडीमध्ये जी काही बिघाडी पाहिली आपण, म्हणजे त्यांचे कोणाचे कोणात पायपुस नाही. या निवडणुकीत देखील मोठ्या प्रमाणात गटबाजी, मतभेद समोर आले आणि उमेदवारांनी देखील अनेक ठिकाणी माघार घेतली. यावरून महाविकास आघाडीची काय परिस्थिती झाली आहे, हे आपण यापूर्वी देखील पाहिले आहे.

महाराष्ट्रात महायुती मजबुतीने यशस्वी वाटचाल करत आहे. कारण महायुती जेव्हा 2022 ला महायुतीचे सरकार आले, तेव्हापासून या राज्यात विकासाची पायाभरणी, विकासाची घोडदौड, केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सातत्याने महाराष्ट्राला पाठबळ देण्याचे काम करतात. मी मुख्यमंत्री असताना अडीच वर्षात जे काही काम केले, विकास प्रकल्प केले, अनेक योजना केल्या त्याचे फळ झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मिळाले. आता मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस पुढील वाटचाल करत आहेत, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, महाविकास आघाडीचे सरकार असताना विकासाला ब्रेक लावण्याचे काम केले, स्थगिती करण्याचे काम केले. ते एक प्रकारचे स्थगिती सरकार होते, आमचे प्रगती सरकार आहे. त्यांचा पाय ब्रेकवर होता, आमचा पाय ॲक्सलरेटरवर आहे. त्यामुळे आमची विकासाची गाडी मोठ्या वेगाने पुढे जात आहे. त्यामुळेच लोक विश्वास दाखवत आहेत, की महायुतीचे उमेदवार विजयी झाले तर त्या त्या मतदारसंघात विकासकामे होतील.

एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती मजबुतीने पुढे जात आहे. महायुतीचे 17 पैकी 17 उमेदवार निवडून आणायचे काम आम्ही करणार आहोत. रायगडला देखील महेंद्र दळवी, थोरवे, भरत गोगावले यांनी पाठिंबा दिला. पुण्यात देखील आपला उमेदवार होता. तिथे सुनेत्रा ताईंनी फोन केला आणि आपण तिथे माघार घेतली. संभाजीनगरमध्ये तसेच इतरही ठिकाणी शिवसेनेचे उमेदवार उभे होते, त्यांना माघार घ्यायला लावली.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


**ढिंग-टांग**




## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सासवड शहरात पर्यावरण रक्षणाचा जागर

# सासवड शहरात उपक्रमांचा धडाका




■ सासवड (ता. पुरंदर) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वाघ डोंगराजवळील पाणी पुरवठा टाकी परिसरात वृक्षारोपण करताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण व इतर मान्यवर.■

> "सासवड शहर 'हरित सासवड' करण्यासाठी नागरिकांनी केवळ पालिकेवर अवलंबून न राहता स्वतःहून उत्स्फूर्तपणे पुढे यावे. प्रत्येकाने जास्तीत जास्त झाडे लावावीत आणि नुसतीच लावू नयेत, तर त्यांचे जबाबदारीने जतन करावे."
> **- आनंदीकाकी जगताप (नगराध्यक्षा) व डॉ. कैलास चव्हाण (मुख्याधिकारी)**

**सासवड (दै. संध्या)**

"५ जून जागतिक पर्यावरण दिन या दिवसाचे औचित्य साधून आज सासवड शहरात पर्यावरण रक्षणाचा अनोखा जागर पाहायला मिळाला. शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण, झाडांचा वाढदिवस आणि ई-व्हीकल चालकांचा सन्मान अशा विविध अभिनव आणि पर्यावरणपूरक उपक्रमांनी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सासवड नगरपालिका, स्थानिक प्रतिष्ठान आणि विविध संस्थांनी यात सक्रिय सहभाग नोंदवला. सासवड नगरपालिकेच्या वतीने वाघ डोंगराजवळील पाणी पुरवठा टाकी परिसरात भव्य वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. याप्रसंगी शहराला हिरवेगार व प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प सोडण्यात आला. याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक राजन जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, प्रदीप राऊत, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण यांच्यासह पालिकेचे सर्व विभागप्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील ऐतिहासिक आणि मुख्य केंद्र असलेल्या पालखी तळावर भाजप शहराध्यक्ष आनंद जगताप आणि पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पालखी तळाचा परिसर सुशोभित आणि पर्यावरणपूरक करण्याचा संदेश देण्यात आला. स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानने यंदा एक अतिशय वेगळा आणि कौतुकास्पद उपक्रम राबवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप आणि सचिव हेमंत ताकवले यांच्या नेतृत्वाखाली सासवड एसटी स्थानक परिसरात दोन विशेष उपक्रम झाले.

प्रतिष्ठानने गतवर्षी लावलेली आणि वर्षभर नियमित पाणी घालून अत्यंत प्रेमाने जगवलेल्या झाडांचा चक्क 'वाढदिवस' साजरा करण्यात आला. झाडे फक्त लावण्यापेक्षा ती जगवणे किती महत्त्वाचे आहे, हाच संदेश यातून देण्यात आला.

प्रदूषणमुक्तीला हातभार लावणाऱ्या आणि 'ई-व्हीकल' (इलेक्ट्रिक वाहने) वापरणाऱ्या जागरूक नागरिकांचा प्रतिष्ठानच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. या दुहेरी उपक्रमामुळे सासवडकरांमध्ये पर्यावरण रक्षणाविषयी एक नवा उत्साह पाहायला मिळाला.

# जुन्या कपड्यांना नवं आयुष्य

## मुंबईत वस्त्र पुनर्वापर, अपसायकलिंगची मोठी मोहीम सुरू; वस्त्रोद्योग आयुक्त वृंदा देसाई यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई (दै. संध्या)**




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रिफायबर (ReFiber) आणि ओटेररी (OterRi) यांच्या वतीने मुंबईतील वापरानंतर टाकून दिल्या जाणाऱ्या कपड्यांच्या कचऱ्याचे संकलन व अपसायकलिंग करण्यासाठी मोठ्या उपक्रमाचा शुभारंभ वस्त्रोद्योग आयुक्त वृंदा देसाई यांनी केला. या उपक्रमाचा उद्देश वस्त्रकचऱ्याचे संकलन, पुनर्वापर आणि मूल्यवर्धन करून पर्यावरणपूरक आणि शाश्वत वस्त्रव्यवस्था निर्माण करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत ५ ते १२ जून दरम्यान मुंबईभर वस्त्र संकलन मोहीम राबवली जाणार आहे.

नागरिक, संस्था आणि विविध गटांना वापरलेले कपडे संकलन केंद्रांवर किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे जमा करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी 'रिफायबर अपसायकल्ड प्रॉडक्ट्स मार्केटप्लेस'चेही उद्घाटन करण्यात आले. टिसरशी संलग्न महिला कारागिरांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असतील. या माध्यमातून वस्त्रकचऱ्याचे मूल्यवर्धन होऊन महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. कार्यक्रमात वस्त्रकचरा व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाचा वापर, भारतातील वस्त्रउद्योगात सर्क्युलॅरिटी वाढवणे आणि 'झिरो वेस्ट' भविष्यासाठी भागीदारी निर्माण करणे या विषयांवरही चर्चा झाली. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग आयुक्त वृंदा देसाई म्हणाल्या, "भारताने वस्त्र पुनर्वापर आणि सर्क्युलॅरिटीच्या क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे. मात्र घरांमधून निर्माण होणाऱ्या वस्त्रकचऱ्याचा अधिक प्रभावी वापर करण्याची मोठी संधी अजूनही आहे. रिफायबरसारखे उपक्रम सरकार, उद्योग आणि नागरिक यांच्या सहकार्याने वस्त्रकचऱ्याला मौल्यवान संसाधनामध्ये बदलू शकतात. जनजागृती, नवकल्पना आणि लोकसहभागातून आपण अधिक शाश्वत वस्त्रव्यवस्थेकडे वाटचाल करू शकतो." टिसरच्या संस्थापक डॉ. मेघा फणसळकर म्हणाल्या, "कचरा म्हणजे नव्याने उपयोगात आणता येणारे संसाधन आहे, असा आमचा विश्वास आहे. वस्त्र अपसायकलिंगद्वारे आम्ही टाकाऊ कापडांपासून उपयुक्त उत्पादने तयार करत आहोत. यामुळे महिलांना रोजगाराच्या संधी मिळत आहेत. रिफायबरसारखे उपक्रम नागरिकांना सर्क्युलर इकॉनॉमीमध्ये सहभागी होण्याची संधी देतात."

# संपादकीय

**इन्फ्लुएन्सर या शब्दाशी आपण सगळेच चांगलेच परिचित आहोत. सोशल मीडियावर अनेक इन्फ्लुएन्सर दिसतात. एखादं उत्पादन, एखादं गॅझेट किंवा एखादी सवय किती चांगली आहे, किती महत्त्वाची आहे आणि तुमच्यासाठी ती किती अत्यावश्यक आहे, हे ते इतरांच्या मनावर ठसवत असतात. एखाद्या इन्फ्लुएन्सरने सांगितलं म्हणजे ते प्रमाण मानून त्यांचे फॉलोअरही ते अमलात आणायला लागतात; पण याच इन्फ्लुएन्सर्सच्या अतिरेकी गदारोळामुळे आता, म्हणजे अगदी अलीकडेच सोशल मीडियावर एक नवा ट्रेंड रुजताना दिसतो. तो ट्रेंड आहे डी-इन्फ्लुएन्सिंगचा..**

## डी-इन्फ्लुएन्सर्स : ही वस्तू विकत घेणं तुम्हाला खरंच गरजेचं आहे?



एका बाजूला इन्फ्लुएन्सर्स एखादी वस्तू, सेवा, ब्रँड रोज उठून तुमच्यावर लादत असताना डी-इन्फ्लुएन्सर मात्र तुम्हाला भुरळ पाडत असलेली वस्तू, सेवा किंवा ब्रँड खरोखरच गरजेचा आहे का? हे विचारून तुम्हाला भानावर ठेवण्याचं काम करत असतो. नवनवीन सौंदर्यप्रसाधनं, गॅझेट्स, कपडे किंवा घरगुती वस्तू खरेदी करण्यासाठी इन्फ्लुएन्सर्स लोकांना प्रोत्साहन देत असतात. त्यामुळे सोशल मीडिया ही शेअरिंगपेक्षा एक प्रचंड मोठी डिजिटल बाजारपेठच झाली आहे. या बाजारपेठेत अनेक इन्फ्लुएन्सर विविध ब्रँड्सकडून पैसे किंवा लाभ मिळवून त्यांची उत्पादनं प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे विकताना दिसतात. इन्फ्लुएन्सर जी वस्तू विकत घेण्यासाठी आपल्याला भरीस घालत आहेत ती वस्तू आपल्याकडे नसल्यामुळे आपलं फार अडत असल्याच्या भावनेने त्यांचे फॉलोअरही खरेदी करत सुटतात. डी-इन्फ्लुएन्सिंग आता या सगळ्यालाच चॅलेंज करताना दिसतं. 'हे विकत घ्या' असं सांगण्याऐवजी काही लोक आता 'हे विकत घेणं तुम्हाला खरंच गरजेचं आहे का?' असं विचारून फॉलोअर्सना त्या विशिष्ट वस्तूची किंमत, तिचा प्रत्यक्ष उपयोग, तिचे फायदे-तोटे, गुण-अवगुण आणि तिला असलेले इतर पर्याय यांबद्दल चर्चा करतात. एखादं उत्पादन अनावश्यक असेल, ते विकताना कंपनीने केलेले दावे फसवे असतील तर तशी स्पष्ट कल्पना हे लोक फॉलोअर्सना देतात. पैशाची उधळपट्टी करण्यास प्रवृत्त करत नाहीत तर परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात.

सध्या हा ट्रेंड विशेषतः तरुण पिढीत लोकप्रिय होत असल्याचं दिसतं. वाढता खर्च, कर्जबाजारीपणा, पर्यावरणावर होणारा अतिरेकी परिणाम आणि सतत काहीतरी नवं हवं असल्यामुळे येणारा अस्वस्थपणा यांमुळे अनेकजण सजग ग्राहक व्हायचा प्रयत्न करत आहेत. इन्फ्लुएन्सर ज्या वस्तू किंवा ब्रँड्सची शिफारस करतात त्यासाठी त्यांना पैसे मिळतात हेही आता सर्वसामान्य लोकांना कळू लागलं आहे. त्यामुळे त्यांना भुलण्याचं प्रमाणही कमी झालं आहे. किमान तसा प्रयत्न तरी होताना दिसतो.

मात्र, एक गंमत अशी की, आता डी-इन्फ्लुएन्सिंग करू पाहणारे अनेकजण स्वतःच इन्फ्लुएन्सर असतात. एखाद्या व्हिडीओमध्ये ते 'ही वस्तू घेऊ नका' असं सांगतात आणि त्याऐवजी दुसरी वस्तू सुचवतात. त्यामुळे काही तज्ज्ञांच्या मते डी-इन्फ्लुएन्सिंग हे कुठल्याही उपभोगवादाविरोधात नाही, तर नवा मार्केटिंग फंडाच आहे. असं असलं तरी आपण काय खरेदी करतो, का खरेदी करतो आणि त्याची आपल्याला खरोखर गरज आहे का, याचा विचार लोक अधिक गांभीर्याने करू लागले आहेत आणि आजच्या काळात ते अधिक महत्त्वाचं आहे, याचा विसर पडू देता कामा नये.

## संस्कृत सुभाषित

एकत: सर्वपापानि मद्यपानं तथैकत:।।

अर्थ – मद्यपान हे महापाप आहे. एका पारड्यात सर्व पापे घातली आणि दुसऱ्या पारड्यात मद्यपान हे एकच पाप घातले तरी मद्यपानानेच पारडे जड होईल.

## गुरु वचन

### मन करारे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण

एक खूप प्राचीन कथा आहे. श्वेतकी नावाचा एक राजा होता. तो खूप यज्ञ करत असे. त्यामुळे त्याची खूप ख्याती झाली होती. त्याने एकदा सलग बारा वर्षे अग्नीदेवाला अखंड शुद्ध तुपाची आहुती दिल्याने अग्नी देवाची पाचनशक्ती वाढली. याचा वाईट परिणाम असा झाला, की अग्नीदेवतेचे तेज कमी झाले आणि तो मंद पडला मग त्याने ब्रह्मदेवाकडे धाव घेतली आणि त्यांना तेज परत मिळविण्याचा मार्ग विचारला. तेव्हा ब्रह्मदेवाने त्याला खांडव येथील जंगल जाळून टाकण्याचा सल्ला दिला. त्याने तसे केले, परंतु इंद्रदेवाने पाणी टाकून ती आग विझवली. मग त्याने कृष्ण आणि अर्जुनाला आपल्या साह्यतेचे आवाहन केले.

अर्जुनाने अग्नी देवाला विनंती केली, की मला देवेंद्राशी युद्ध करण्यासाठी तू शस्त्रे पुरवायची. अग्नी देवाने त्याला गांडीव धनुष्य आणि दिव्यास्त्र दिले, तर कृष्णाला एक चक्र भेट दिले. यानंतर अग्नी देवाने आपल्या शक्तीद्वारे पुन्हा खांडव जंगल जाळण्यास सुरुवात केली.

वाढत्या आगीने पृथ्वीवर मात्र हाहाकार माजला. त्यावर परत देवेंद्राने आपल्या शक्तीने पाऊस पाडण्यास सुरुवात केली, परंतु अर्जुन आणि कृष्णाने पावसाला रोखले. यावेळी इंद्राच्या मदतीला देव, असुर, यक्ष, राक्षस, सर्प असे अनेक जण धावून आले, परंतु या साऱ्यांचा कृष्ण आणि अर्जुनापुढे निभाव लागला नाही.

अखेर अग्नी देवतेने आपली आग पसरवल्याने त्यांची तब्येत पूर्ववत झाली. आणि त्यांच्या चेहऱ्यावर तेज परतले. तात्पर्य इतकेच की, जर शरीर सुखी असेल, तर मनही प्रसन्न राहते. आणि मन प्रसन्न तर चेहऱ्यावर आपोआप तेज दिसते.

तुम्हाला ताजेतवाने दिसायचे असेल तर तुम्हाला आपले शरीर तर स्वस्थ ठेवायलाच हवे. परंतु, याच सोबत आपले मनही प्रसन्न ठेवणे गरजेचे आहे.

## उपदेशकथा

### हर्षशोक

भारतीय युद्धामध्ये घटोत्कचाला मरण आले. पांडवांकडील सगळे रडू लागले. फक्त भगवान श्रीकृष्ण तेवढे प्रसन्न होते. पुन्हा पुन्हा आपला आनंद प्रगट करून ते अर्जुनाची पाठ थोपटीत होते. श्रीकृष्णाला एवढे प्रसन्न पाहून अर्जुन म्हणाला, ''अरे मधुसुदना ! घटोत्कच केवढा महावीर होता. तो मेला म्हणून सारे पांडव व त्यांची सेना शोकाकुल झाले आहेत आणि तू मात्र प्रसन्न आहेस. याचे कारण काय?'' श्रीकृष्ण म्हणाले, ''अर्जुना ! आज खरोखर आनंदाचा प्रसंग आहे. घटोत्कच मेला हे खरे पण माझा प्राणप्रिय अर्जुन वाचला यात शंका नाही. अरे, कर्णापाशी कवचकुंडले होती. इंद्राने ती मागून नेली पण जाताना त्याने कर्णाला एक भयंकर शक्ती दिली. ती शक्ती त्याच्याजवळ असेपर्यंत त्याला कोणी मारू शकत नव्हते. इतकेच नव्हे तर ती शक्ती वापरून तो तुझा वध करणार होता. ती शक्ती घटोत्कचावर वापरल्याने तो मेला पण तू वाचलास. आता कर्णाला मारणे कठीण नाही.''

कथा उपदेश : मानवी जीवनातील घटना मंगल व अमंगल मिश्रित असतात. म्हणून कोणतीही घटना घडली तरी एकदम सुखी वा दु:खी होऊ नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:ऐन्द्र १०:०३:५७ |
| ६ जून २०२६ | करण:गर १४:०५:०७ |
| शनिवार | करण:वणिज |
| विक्रम संवत्– २०८२ | २६:४१:२६+ |
| श्रावणशके संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:कुम्भ१९:०३:२९ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४७ |
| मास–अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – २० |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:षष्टी २६:४१:२६+ | शिवराज्याभिषेक |
| नक्षत्र:श्रवण ०६:०३:०५ | सोहळ – किल्ले रायगड |

## दै.'संध्या'धमाल सूडोकु क्र. ९७०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | 4 | | |
| | 4 | 8 | 2 | 9 | 5 | | 1 | |
| | | 2 | | | 7 | | 3 | |
| | | | 4 | 5 | | 7 | | 1 |
| | | | 3 | | 9 | | | |
| 8 | | 4 | | 1 | 2 | | | |
| | 5 | | 1 | | | 3 | | |
| | 8 | | 5 | 2 | 6 | 9 | 7 | |
| | | 7 | | | | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

#### सूडोकु क्र. ९६९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | 6 | 1 | 9 | 7 | 5 | 3 | 2 |
| 9 | 2 | 7 | 8 | 5 | 3 | 4 | 6 | 1 |
| 5 | 3 | 1 | 4 | 6 | 2 | 7 | 9 | 8 |
| 3 | 7 | 9 | 6 | 4 | 8 | 2 | 1 | 5 |
| 1 | 5 | 4 | 3 | 2 | 9 | 8 | 7 | 6 |
| 2 | 6 | 8 | 7 | 1 | 5 | 9 | 4 | 3 |
| 7 | 1 | 2 | 9 | 8 | 6 | 3 | 5 | 4 |
| 8 | 4 | 3 | 5 | 7 | 1 | 6 | 2 | 9 |
| 6 | 9 | 5 | 2 | 3 | 4 | 1 | 8 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५२३ – गुस्ताफ व्हासाची स्वीडनच्या राजेपदी निवड.
- १७५२ – मॉस्कोत प्रचंड आग. १८,००० घरे आगीत नष्ट.
- १८०९ – स्वीडनने नवीन संविधान अंगिकारले.

### राष्ट्रीय

- १६७४ – शिवाजी महाराजांना काशीवे महापंडित गागाभट्ट यांनी राज्याभिषेक केला.
- १८८२ – मुंबईत चक्रीवादळ. १,००,०००हून अधिक ठार.
- १९८१ – भारताच्या बिहार राज्यात सहार्सा शहराजवळ मध्ये बागमती नदीवरील पुलावर रेल्वे गाडी घसरली. अधिकृत २६८ ठार, ३०० गायब. अनधिकृत आकडा – १,००० ठार.
- १९८४ – ऑपरेशन ब्ल्यु स्टार समाप्त. ५७६ ठार, ३३५ जखमी.
- १९८४ – भारतीय सैन्याने सुवर्ण मंदिरात प्रवेश केला.

### जन्म

- १२३६ – वेन तियानशिंग, चीनी पंतप्रधानचा जन्म.
- १५०२ – होआव तिसरा, पोर्तुगालचा राजाचा जन्म.
- १७१४ – होजे पहिला, पोर्तुगालचा राजाचा जन्म.
- १८७२ – अलेक्झांड्रा, रशियाची झारिनाचा जन्म.
- १८९१ – मारुती वेंकटेश अय्यंगार, कन्नड कवी, कथाकार कादंबरीकारचा जन्म.

### निधन

- १३९३ – गो–एन्यु, जपानी सम्राटचे निधन.
- १८६१ – काउंट कॅमियो बेन्सो दि कॅव्हूर, ईटलीचा पंतप्रधानाचे निधन.
- १८९१ – सर जॉन ए. मॅकडोनाल्ड, कॅनडाचा पंतप्रधानाचे निधन.
- १९६१ – कार्ल गुस्टाक युंग, स्विस मानसशास्त्रज्ञाचे निधन.

## : SMS :

Boys Saying
1 day I read
smoking is bad
"I stop smoking"
1 day I read
drinking is bad
"I stop drinking"
1 day I read making
girlfriend is bad
I stop reading...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९ | २९.२ |
| अहमदनगर | ३७.४ | २४.९ |
| अकोला | ४४.३ | ३१.१ |
| अमरावती | ४२.६ | ३३.१ |
| बीड | ४४.६ | ३२.५ |
| भंडारा | ४४ | ३२.८ |
| बुलढाणा | ४३ | २९.१ |
| चंद्रपूर | ४४.४ | ३३ |
| चेन्नई | ४२.६ | ३२.७ |
| नवी दिल्ली | ४२.५ | ३१.७ |
| धुळे | ४४ | २९.४ |
| गोंदिया | ४२.६ | ३२ |
| जळगाव | ४४.३ | ३१.५ |
| कोल्हापूर | ३६ | २३ |
| लातूर | ३८.७ | २६.३ |
| मुंबई | ४०.८ | ३४.६ |
| नागपूर | ४२.७ | ३१.८ |
| नांदेड | ४२.९ | ३०.७ |
| नंदूरबार | ४०.९ | २९.५ |
| नाशिक | ३८.८ | २५ |
| पुणे | ३६ | २३.५ |
| पंढरपूर | ३८.१ | २५.७ |
| सातारा | ३७.२ | २२ |
| सांगली | ३७.७ | २३.५ |
| सोलापूर | ३८.३ | २६ |
| वर्धा | ४४.५ | ३३.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम दूरदर्शिपणामुळे व चातुर्यामुळे अनेक अडचणी पार पडतील.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण कामात हस्तक्षेप करू नका व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबध दृढ होतील. व्यापारात स्पष्टपणा राखा.

**सिंह :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:पश्चिम व्यवसायात यश मिळेल. अडकलेला पैसा मिळेल. अधिक विश्वास दाखवून कामे करू नका.

**कन्या :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर आर्थिक तंगी वाढल्याने व कौटुंबिक अडचणीमुळे मानसिक स्थिती चांगली राहणार नाही.

**तुळ :** शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा: उत्तर नवीन योजना फायदेशीर राहतील. मानसिक तणावापासून मुक्ति मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणीमुळे निराश रहाल.


**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर प्रसन्न वातावरण असल्यामुळे आपण केलेले प्रयत्न यशस्वी राहतील. नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मकर :** शुभ रंग: पांढरा : शुभ दिशा: पश्चिम रोजगारामध्ये बदल किवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण आपल्या कामाची लोक स्तुती करतील. विचारपूर्वक काम केल्यामुळे कामकाजाची स्थिती भक्कम होईल.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण मुलांच्या प्रगतीचे योग आहेत. कामात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. आपले मन उत्साहित राहील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९७०



### आडवे शब्द

१. धन्यवाद
३. नवरत्नांपैकी चार
१०. आमंत्रक, कार्यप्रमुख
१२. क्रिकेटमधील धाव
१३. सांघिक परेड
१५. आश्चर्य
१७. धैर्य, हिंमत
१८. सुरुवातीचा, मूळ
१९. सफल
२१. पायंडा, प्रथा
२३. बागबगीचा
२४. वर्तमानपत्रातील स्तंभ, २५. साडी
२६. गाणे म्हणणाऱ्या प्रत्येकाला या उपाधीने संबोधता येत नाही!
२८. पोट
२९. बारा वर्षांचा काळ
३०. बस्तान
३१. भीती
३३. आईचा भाऊ
३४. प्रेम, पैसा
३६. ठाणे परिसरातील आदिवासी जमात
३७. कोवळी फांदी
३९. बरोबर काम करणारा
४१. विष
४२. तफावत, फरक
४४. हार, माळ
४५. जलद गतीने जाणारा
४७. फणसातील खाण्याचा भाग
४८. उलटसुलट चर्चा
४९. सडसडीत
५१. पूर्ण भरतीची वेळ
५२. रक्षण करणारा
५४. अंगावरील बारीक केस
५५. विनासायास, विनाकारण
५६. परग्रहावर जाणारे वाहन
५९. धनी
६१. व्यवस्था, प्रशासन
६२. कन्या, मुलगी
६४. लत्ताप्रहार
६६. रसदार
६९. वाचण्यास योग्य
७१. प्रफुल्लित, ताजे
७३. पंजाबमधील एक नदी
७५. हात
७६. केर
७७. उपहास, फजिती
७८. चिंतन
७९. रामाला वाहिली जाणारी सुगंधी वनस्पती
८०. तंबाखूचे सुगंधी चूर्ण

### उभे शब्द

१. बैठक, स्थान
२. रात्रंदिवस
३. बर्फाळ पर्वतराजी
४. अरण्य
५. कधी हा नथीतून मारला जातो!
६. सन्मानाची अल्प रक्कम
७. लोणच्यासाठी कैरी अशी हवी
८. बारीक खिळा
९. धोकादायक
११. संत तुकारामांच्या अभंगात सुखाचे मोजमाप करणारे धान्य!
१४. सवाद्य, आनंदाने
१६. नाकारणे
१८. पाणी
२०. दिवाळीतील ऋतू
२२. हाताचा भविष्य दर्शवणारा भाग
२३. प्रकाश
२५. पातक
२७. कवितेत शब्दाला जुळणारा शब्द
२८. पार्वती
२९. सिद्धता
३२. रड्या मनुष्य
३३. बनकर
३४. कोकणीत 'मला'
३५. पोलिस, कोतवाल
३६. तारतम्याने वागण्यासाठी हे दोन्ही बघणे आवश्यक
३८. पराभव
४०. शिव शिव
४२. शरीर, उपजत कौशल्य
४३. आदिमाया, पार्वती
४४. आंचळ
४६. बातमीदार
४८. कडधान्याचे कालवण
४९. संपूर्ण
५०. शक्ती, जोर, बळ
५३. माफी मागणारा
५५. सभेत न घाबरता बोलणारा
५६. वरवधूमधील पडदा
५७. खाण्यात 'राम' आणणारे म्हणून मिठाला पडलेले नाव?
५८. नम्र, वाकलेला
६०. वाटाणा
६३. कोरा
६५. मत देण्याचा अधिकार असलेला
६७. गार
६८. मुलायम, तलम
७०. ढग
७१. सोन्याचा कस
७२. वरवधूची मिरवणूक
७४. लोक, प्रजा
७६. आत्मसन्मान जपण्यासाठी हा नेहमी ताठ हवा!

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६९ चे उत्तर

आडवे उत्तर
१.नयन ३.कविता ६.कमतरता १०.सोगा १२.परतपरत १४.शीतपेय १६.नवरानवरी १९.वापर २१.खातरजमा २४.पसा २५.तपन २६.तमासगीर २८.नवा ३०.सान ३१.वाकडसर ३२.लगट ३५.परका ३७.पंख ३८.पत्रकारपरिषद ४२.दामोदर ४४.रव ४५.टणत्कार ४६.कसर ४७.पत ४९.करवा ५१.मनन ५३.दीनवाणा ५५.सकटनिकट ५८. रमारम ६०.मस ६१.कनात ६२.लंकाधिपती ६३.वन ६४.खास ६५.रमा ६७.तम ६९.साधना ७१.बेताबेताने ७३.जंगी ७५.तरस ७६.हनन ७७.गतवधा ७९.कसरत ८०.मस्तवाल ८१.खोत

उभे उत्तर : १.नवीन २.नखरा ४.विपरीत ५.तार ६.कप ७.मरवा ८.ततपप ९.तारा १०.सोपे ११.गायरान १३.तनुज १५.तळतळाट १७.वर्तमानपत्र १८.वखार २०.रसातल २२.रक्षक २३.मानस २६.तसा २७.गीतकार २९.वारसदार ३३.गजर ३४.नरवर ३६.रकाना ३७.परसदार ३८.पदोपदी ३९.पदर ४०.षट ४१.दणकट ४३.दमन ४८.तनमनधन ४९.कणा ५०.वासना ५२.नरपती ५४.वास ५६.कतरबेत ५७.कलंक ५९.माती ६१.कसबेकर ६३.वसाहत ६६.माता ६७.तर ६८.मसलत ७०.नानक ७२.नेमस्त ७३.जंगल ७४.गीत ७५.तवा ७८.धक्का

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजपा सिख अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने वृक्षारोपण



पुणे (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी सिख अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने खेड शिवापुर वरवे गाव येथे भारतीय जनता पार्टी सिख अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष जसप्रीत सिंग सलुजा यांच्या हस्ते भव्य वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सुमारे 30 विविध प्रकारचे झाडे लावण्यात आले. याप्रसंगी प्रकाश भरत, सुखदेव बोरडे, विशाल वरुटे, लालचंद यादव आदी उपस्थित होते. निसर्गाचे रक्षण ही सामूहिक जबाबदारी आहे त्यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे असे मत भारतीय जनता पार्टी सिख अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष जसप्रीत सिंग सलुजा यांनी व्यक्त केले.

### पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात आदर्श आचारसंहिता संपुष्टात

■ विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध झाल्याने निवडणूक आयोगाचा निर्णय

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुका-२०२६ अंतर्गत पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील निवडणूक बिनविरोध झाल्याने येथे लागू असलेली आदर्श आचारसंहिता तत्काळ प्रभावाने संपुष्टात आली आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य कार्यालयाने जारी केलेल्या पत्रानुसार, ज्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांमधील निवडणुका बिनविरोध पार पडून निकाल जाहीर करण्यात आले आहेत, त्या मतदारसंघांमध्ये लागू असलेली आचारसंहिता रद्द करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात लागू असलेली आदर्श आचारसंहिता आता संपुष्टात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिली आहे. पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम संजय काकडे यांची ४ जून २०२६ रोजी बिनविरोध निवड जाहीर झाली होती. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी फॉर्म २१A मध्ये याबाबतची अधिकृत घोषणा केली होती. इतर कोणताही उमेदवार रिंगणात न राहिल्याने निवडणूक बिनविरोध झाली होती. आचारसंहिता संपल्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रखडलेली विकासकामे, धोरणात्मक निर्णय आणि शासकीय योजना पूर्ववत सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, उर्वरित मतदारसंघांमध्ये जिथे निवडणूक प्रक्रिया सुरू आहे, तिथे आचारसंहिता कायम राहील.




### एमआयटी एडीटी विद्यापीठात 'एक पेड़ माँ के नाम' मोहिम

■ जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणासह पर्यावरणविषयक लघुपटांचे प्रदर्शन

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठात 'एक पेड़ माँ के नाम' या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय मोहिमेअंतर्गत ३०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ नेव्हल एज्युकेशन अँड ट्रेनिंग (मॅनेट) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यापीठाचे प्र-कुलपती व कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड यांच्या प्रेरणेने तसेच कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या मोहिमेत मॅनेटच्या ३०० कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कांचन, बहावा, गुलमोहर आणि पाम (ताड) यांसह विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड विद्यापीठ परिसरात करण्यात आली. या प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. नचिकेत ठाकूर, विद्यार्थी कल्याण संचालक प्रा. डॉ. सूराज भोयर, मॅनेटचे प्राचार्य कॅप्टन प्रेरित मिश्रा, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण, एमआयटी स्कूल ऑफ ड्रामाचे प्राचार्य डॉ. अमोल देशमुख, सुरक्षा व दक्षता संचालक कर्नल प्रशांत वाघमारे, उपकुलसचिव डॉ. हनुमंत पवार, सहाय्यक संचालक डॉ. प्रतिभा जगताप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेच्या दशकपूर्ती वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात वृक्षारोपणाबरोबरच पर्यावरण जनजागृतीलाही प्राधान्य देण्यात आले. यानिमित्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या तीन पर्यावरणविषयक लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले. यामध्ये 'पृथ्वी आपली, जबाबदारीही आपली!', 'बिन इट राइट!' आणि 'गिरिमित्र' या लघुपटांचा समावेश होता. निसर्ग संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत जीवनशैली यांविषयी प्रभावी संदेश या चित्रफितींमधून देण्यात आला. 'पर्यावरण संवर्धन ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून ती जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे. हरित परिसर निर्मितीसाठी आणि भावी पिढ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे,' असे मत डॉ.नचिकेत ठाकूर यांनी व्यक्त केले. भविष्यातही पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### वारजेतील लॉजवर पोलिसांचा छापा; अल्पवयीन मुलीसह महिलेची सुटका



पुणे (दैनिक संध्या) : मुंबई-बंगळूर महामार्गावरील वारजे परिसरातील एका लॉजवर छापा टाकून गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (एएचटीयू) वेश्याव्यवसायातून एका अल्पवयीन मुलीसह महिलेची सुटका केली. या प्रकरणी वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या एका महिला एजंटला अटक करण्यात आली आहे. आश्लेषा सचिन सोमनकर (वय ३४, सध्या रा. वारजे; मूळ रा. माहीम, मुंबई) असे आरोपीचे नाव आहे. तिच्याविरुद्ध वारजे पोलिस ठाण्यात लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 'साई एक्झिक्युटिव्ह लॉजिंग अँड बोर्डिंग' येथे महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती पोलिस निरीक्षक छगन कापसे यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून खात्री केली. त्यानंतर गुरुवारी (ता. ४) रात्री अचानक छापा टाकला. या कारवाईत एका अल्पवयीन पीडितेसह महिलेची सुटका करण्यात आली आहे.

# बीआरटी मार्गिका काढण्याच्या प्रस्तावावर प्रशासन सकारात्मक!

## पीएमपीएमएलचा विरोध, येरवडा वाहतूक विभागाचा पाठिंबा : स्थायी समिती घेणार अंतिम निर्णय

पुणे (दै. संध्या)

विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोड या गजबजलेल्या मार्गावरील बीआरटी मार्गिका काढून टाकण्याचा प्रस्ताव पुणे महापालिकेच्या स्थायी समितीकडे सादर करण्यात आला आहे. राष्ट्रवादी कांग्रेस चे नगरसेवक सुहास टिंगरे यांनी हा प्रस्ताव दिला होता. वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण वाढल्याने स्थानिक नागरिक, व्यापारी व वाहनचालकांकडून ही मागणी होत आहे. असे प्रस्तावात म्हटले होते. यावर आता प्रशासनाकडून अभिप्राय सादर करण्यात आला आहे. पथ विभागाने म्हटले आहे की, पुणे आळंदी रस्ता येथील बीआरटी काढून टाकल्यानंतर बस आणि इतर वाहनांना दोन लेन खुल्या होणार आहेत. ते



नागरिकांच्या सोयीचे होणार आहे. यावर आता स्थायी समिती अंतिम निर्णय घेणार आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्थायी समिती समोर सादर केलेल्या अभिप्राय नुसार , सध्याच्या परिस्थितीत ही बीआरटी मार्गिका वाहतुकीसाठी अडथळा ठरत आहे. मार्गिका काढल्याने रस्त्याची पूर्ण रुंदी सर्व वाहनांसाठी उपलब्ध होऊन वाहतूक सुरळीत होईल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे. मात्र पीएमपीएमएलने या प्रस्तावाला विरोध दर्शवला आहे. सध्या या मार्गावर दररोज १२६ बसांद्वारे ८० हजार प्रवासी प्रवास करतात. मार्गिका काढल्यास वाहतूक कोंडी वाढून बससेवा विस्कळीत होईल, असे पीएमपीएमएलचे म्हणणे आहे.

दुसरीकडे येरवडा वाहतूक विभागाने बीआरटी मार्गिका काढण्याला पाठिंबा दिला आहे. त्यांच्या मते यामुळे अपघात कमी होतील आणि रस्त्याची रुंदी वाढेल. विश्रांतवाडी येथे सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे मार्गिकेची उपयुक्तता कमी झाल्याचेही पत्रात नमूद आहे.

महापालिका पथ विभागाने म्हटले आहे की, या मार्गावर साठे बिस्किट बस थांबा येथे बीआरटी मार्गिका खंडित झाली असून, येरवडा मनोरुग्णालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बॉम्बे सॅपर्स चौक अशा ठिकाणी दुसऱ्या बाजूची बीआरटी मार्गिका ओलांडून वाहने ये-जा करतात. त्यामुळे अपघातप्रवणता वाढली आहे. तसेच बीआरटी मार्गिकेतून विरुद्ध दिशेने दुचाकी वाहनं येऊन अपघात होत आहेत.

विश्रांतवाडी चौक येथे सुरू असलेल्या भुयारी मार्ग आणि उड्डाणपुलाच्या कामामुळे तसेच संगमवाडी, आंबेडकर चौक, येरवडा-परकुटी आणि डेक्कन कॉलेज रस्त्यावरील १० ते १५० मीटरच्या कामांमुळे उर्वरित बीआरटी मार्गिकेची उपयुक्तता लक्षणीयरीत्या घटली आहे, असेही नमूद आहे.

पथ विभागाने म्हटले आहे की, पुणे आळंदी रस्त्यावरील बीआरटी मार्गिका काढल्यास वाहतूक कोंडी सुटेल पुणे आळंदी मार्गावर बिंदुमाधव ठाकरे चौक ते साठे बिस्कीट दरम्यान बीआरटी मार्गिकेमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन नागरिकांचा वेळ वाया जात आहे. बीआरटी मार्गिका काढून टाकल्यास बस सेवेसह इतर वाहनांसाठी अतिरिक्त २ लेन खुल्या होतील आणि नागरिकांची सोय होईल.

हा अभिप्राय स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर केला आहे. अंतिम निर्णय आता स्थायी समिती घेणार आहे.

### सुहास टिंगरे यांनी काय केल्या होत्या मागण्या?

१. विश्रांतवाडी चौक ते फुलेनगर रोडवरील बीआरटी मार्गिका तात्काळ काढण्यात यावी.
२. रस्त्याची पूर्ण रुंदी सर्वसामान्य वाहतुकीसाठी उपलब्ध करून द्यावी.
३. वाहतुकीचा सुरळीत प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी अभ्यास करून योग्य नियोजन करावे.
४. भविष्यात बीआरटी प्रकल्प राबविताना स्थानिक परिस्थिती, वाहतुकीचा ताण आणि नागरिकांचे मत विचारात घ्यावे.

## CDMO कार्यक्रमाचे कमर्शियल एक्सीक्यूशन सुरू

पुणे (दै. संध्या)

मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष 2025-26 च्या चौथ्या तिमाहीत (Q4 FY26) दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत कंपनीचा निव्वळ नफा 69 टक्क्यांनी वाढून 20 कोटी रुपयांवर पोहोचला असून एकूण महसूल 22 टक्क्यांनी वाढून 472 कोटी रुपये झाला आहे. निर्यात व्यवसायातील वाढ आणि मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायातील विस्तारामुळे ही वाढ साध्य झाल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

कंपनीच्या API (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडिएंट) व्यवसायात चौथ्या तिमाहीत 17 टक्के वाढ झाली, तर मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायात 31 टक्क्यांची वाढ झाली. संपूर्ण आर्थिक वर्ष FY2025-26 मध्ये कंपनीचा स्टँडअलोन एकूण महसूल




1,700 कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला असून तो मागील वर्षाच्या तुलनेत 8 टक्क्यांनी अधिक आहे. संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2026 साठी भागधारकांना 10 टक्के लाभांश देण्याची शिफारस केली आहे. कंपनीने सलग चौथ्यांदा यूएसएफडीए तपासणी कोणत्याही प्रतिकूल निरीक्षणाशिवाय (Nil 483 Observation) यशस्वीरित्या पूर्ण केल्याची माहिती दिली. याशिवाय दीर्घकालीन उत्पादन कार्यक्रमांतर्गत व्यावसायिक उत्पादनालाही सुरुवात करण्यात आली आहे.

## अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

पुणे (दै. संध्या)

आगामी गणेशोत्सव अधिक पर्यावरणपूरक, शिस्तबद्ध आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त पद्धतीने साजरा करण्याच्या उद्देशाने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१, पर्यावरण विभाग अंतर्गत "माय सिटी माय प्रॉमिस" शिस्त व पर्यावरणपूरक वर्तन बदलासाठी अभियान आणि जय गणेश व्यासपीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ – मार्गदर्शन शिबिर" आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजल्यापासून लोकमान्य सभागृह, टिळकवाडा, नारायण पेठ येथे होणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे समन्वयक विष्णू भेडा व पीयूष शाह यांनी दिली

गणेशोत्सवातील विविध पैलूंवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन या शिबिरात मिळणार आहे. इतिहासकार, लेखक व संशोधक मंदार लवाटे




हे "गणेशोत्सव संस्कृती आणि सामाजिक महत्त्व" या विषयावर मार्गदर्शन करतील. पारंपरिक कला पुनरुज्जीवनासाठी कार्यरत असलेले डिझायनर चंद्रशेखर भेडा (नवी दिल्ली) हे "गणेशोत्सव देखावे व रथ : कला, हस्तकला आणि नावीन्यपूर्णता" या विषयावर विचार मांडतील.

संगणक तज्ज्ञ व लेखक डॉ. दीपक शिकारपूर हे "तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) चा वापर" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई हे ध्वनीप्रदूषण आणि लेझर लाईटमुळे होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती देतील. तसेच रोटेरियन मनोज धारप हे निर्माल्य व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करतील.

याशिवाय "नेट झिरो संकल्पना आणि अनुकरणीय गणेशोत्सव पारितोषिक २०२६" याबाबतही सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. कार्यक्रमात नामवंत मंडळांचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, रोटरीचे सदस्य, पोलीस अधिकारी, कलाकार आणि पत्रकार सहभागी होऊन चर्चासत्रात सहभाग नोंदविणार आहेत.

## पुणे इंटरनॅशनल स्कूलमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

### चलवादी शिक्षण संस्था पर्यावरण संवर्धनासाठी वचनबद्ध : ॲड. रेणुकाताई चलवादी

पुणे (दै. संध्या)

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून चलवादी शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यानगर येथील पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या परिसरात शुक्रवारी (ता.५) वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाचा समतोल राखणे आणि भावी पिढीला हिरवेगार भविष्य देणे या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी आणि उपाध्यक्षा ॲड. रेणुका चलवादी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या परिसरात मान्यवरांच्या हस्ते विविध औषधी व सावली देणाऱ्या रोपांची लागवड करून झाली. यावेळी उपस्थित



सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि उपस्थितांना संस्थेच्या वतीने रोपांचे वाटप करण्यात आले. प्रत्येक कर्मचाऱ्याने एका झाडाची जबाबदारी घेऊन त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी केला.

केवळ झाडे लावणे पुरेसे नसून, त्यांचे मुलासारखे संगोपन करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. आज लावलेले एक रोप उद्याच्या समृद्ध आणि निरोगी समाजाचा पाया ठरेल, त्यामुळे पर्यावरण रक्षणाची सुरुवात स्वतःपासून करा, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी यानिमित्ताने बोलतांना केले. संस्थेच्या उपाध्यक्षा ॲड. रेणुका चलवादी यांनी संस्थेच्या आगामी उपक्रमांची माहिती देताना सांगितले की, "निसर्गाचा समतोल राखण्यासाठी केवळ एका दिवसाचा उत्साह नको, तर सातत्य हवे. याच भूमिकेतून शाळेच्या परिसरात पुढील ५ दिवस वृक्षारोपण अभियान राबवले जाईल." पुढे बोलताना त्यांनी, "प्रदूषणाच्या या काळात वसुंधरेला पुन्हा हिरवाईने नटवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या दिवशी किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे," असा संकल्प करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी प्राचार्या स्मिता लोंढे, सायली शिंदे, उप-प्राचार्या बिना कदम, जयश्री कदम, ज्योती सचदेव यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाच्या प्रशासनाने घेतलेल्या या पर्यावरणपूरक पुढाकाराचे परिसरातून कौतुक होत आहे. कार्यक्रमाचा समारोप सर्वांनी पर्यावरण रक्षणाची शपथ घेऊन केला.

## लक्ष्मीनगर पोलिसांची धडक कारवाई; आरोपीसह देशी पिस्तूल जप्त

पुणे (दै. संध्या)

लक्ष्मीनगर पोलिसांनी गुन्हेगारांविरोधातील विशेष कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान सापळा रचून एका रेकॉर्डवरील पाहिजे आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. येरवडा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी साजिद ऊर्फ डीजे मोहम्मद शेख (वय २०, रा. कामराजनगर, येरवडा) हा आपल्या राहत्या घरी येणार असल्याची गोपनीय माहिती लक्ष्मीनगर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व तपास पथकाने संबंधित परिसरात सापळा रचला.पोलिसांनी आरोपीच्या घरावर छापा टाकला असता तो घरात लपून बसल्याचे आढळले. दरवाजा उघडत नसल्याने पोलिसांनी योग्य त्या बळाचा वापर करून प्रवेश केला. यावेळी आरोपीसह आणखी एक व्यक्ती पहिल्या मजल्यावरील खिडकीतून शेजारच्या घरांच्या छतावरून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होती. मात्र पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून साजिद ऊर्फ डीजे मोहम्मद शेख तसेच शुभम राजेंद्र बोत (वय २६, रा. घोरपडी) यांना शिताफीने ताब्यात घेतले.पंचांसमक्ष करण्यात आलेल्या झडतीदरम्यान साजिद शेख याच्याकडून एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल व एक जिवंत राऊंड जप्त करण्यात आले. त्यानंतर दोघांनाही पुढील कायदेशीर कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

# कोथरूड-बावधनमध्ये पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

पुणे (दै. संध्या)

■ आरोग्य शिबिर आणि स्वच्छता रॅलीचा धडाका


■ खासदार मेधा कुलकर्णी, नगरसेवक, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

■ २३५ नागरिकांची आरोग्य तपासणी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने वृक्षारोपण, पर्यावरण-स्वच्छता प्रभात फेरी आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिर असे विविध उपक्रम मोठ्या उत्साहात राबवण्यात आले.

पुणे शहराच्या राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, नगरसेवक प्रतिनिधी, कोथरूड भागातील नागरिक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, स्वच्छ, जनवानी सहकारी संस्था आणि कमिन्स इंडिया लि. यांच्या संयुक्त विद्यमाने हे उपक्रम राबवण्यात आले.

प्रभाग क्रमांक १०, ११, ३१ मधील गोपीनाथ नगर टेकडी पायथ्याशी जनसेवक अमित तोरडमल यांच्या आयोजनातून वृक्षारोपण कार्यक्रम झाला. खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, गिरिश खत्री, क्रीडा समिती सदस्या अल्पना वर्पे, नगरसेविका ज्योत्स्ना कुलकर्णी, डॉ. मनिषा बुटाला, महापालिका सहाय्यक आयुक्त सुहास जाधव यांच्या हस्ते रोपटे



लावण्यात आले. यावेळी वरिष्ठ आरोग्य निरीक्षक राम सोनवणे, आरोग्य निरीक्षक करण कुंभार, राजेश आहेर, दत्तात्रय दळवी, गणेश साठे, प्रमोद चव्हाण, गणेश चोंधे, किरण जाधव, नासिर शेख, ब्रँड अँबेसिडर वैजीनाथ गायकवाड, आण्णा ढावरे, अशोक कांबळे तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोथरूडमधील थोरात उद्यान, आयडियल कॉलनी, गुजरात कॉलनी, मयूर कॉलनी, शिवतीर्थ नगर, ए.आर.ए.आय. टेकडी, डहाणूकर कॉलनी, भुसारी कॉलनी येथे शिवसाम्राज्य प्रतिष्ठानच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नगरसेवक पृथ्वीराज सुतार, परिमंडल कार्यालय क्रमांक २ चे उपायुक्त अविनाश सकपाळ, सहाय्यक आयुक्त सुहास जाधव, प्रभाग समितीच्या अध्यक्षा ॲड. वासंती जाधव, नगरसेवक दिनेश माथवड, जनसेवक नवनाथ जाधव यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले.

शिबिरात महिला व पुरुषांच्या बीपी, मॅमोग्राफी, रक्ताच्या विविध तपासण्या करण्यात आल्या. एकूण २३५ नागरिकांनी याचा लाभ घेतला.

सुतारदरा, म्हातोबा नगर, हनुमान नगर, केळेवाडी, किष्किंधा नगर परिसरात पर्यावरण आणि स्वच्छतेची प्रभात फेरी काढण्यात आली. "झाडे लावा झाडे जगवा, प्लास्टिकचा वापर टाळा, ओला-सुका कचरा वर्गीकरण करा, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नका, आपला परिसर स्वच्छ ठेवा, पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

नागरिकांना कागदी व कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे, जंगल, जल, जमीन यांचे संरक्षण करण्याचे आणि वृक्षतोड टाळण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चेअरमन पदी किशोर फडतरे तर व्हाईस चेअरमन पदी पुरुषोत्तम गाढवे यांची निवड

बारामती (दैनिक संध्या) : बारामती दूध संघाची प्रगती स्व.अजित दादा पवार साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे झाली असून मा.श्रीमती सुनेत्रावहिनी पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,मा.पार्थ दादा पवार,खासदार,राज्यसभा तसेच युवा नेते मा.जय दादा पवार यांचे वेळोवेळी दूध संघाला मार्गदर्शन होत असते.संघाचे चेअरमन श्री.संजय रामचंद्र कोकरे व व्हाईस चेअरमन श्री.दत्तात्रय सदाशिव वावगे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे नवीन चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची निवड मा.श्रीमती सुनेत्रावहिनी पवार,उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांची सूचनेनुसार आज 05/06/2026 रोजी करण्यात आली असून श्री.किशोर भगवानराव फडतरे,निंबोडी यांची चेअरमन पदी तर श्री.पुरुषोत्तम शिवाजीराव गाढवे, आंबी यांची व्हाईस चेअरमन पदी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून मा.श्री. श्रीकांत श्रीखंडे,अध्यासी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (दुग्ध) पुणे यांनी काम पाहिले. सदर चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री.संभाजी नाना होळकर,तालुकाध्यक्ष श्री.संदीप तात्या बांदल,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुका अध्यक्षा सौ.वनिताताई लडकत,बाजार समितीचे सभापती श्री.विनायक गावडे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, मा. संचालक मंडळ, संघाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.श्री.योगेश राणे व उपमहाव्यवस्थापक श्री.अमोल चव्हाण इ.उपस्थित होते.




### राजगुरुनगर येथे कॉपी राईट उल्लंघन प्रकरणी खेड पोलिसांची मोठी कारवाई

■ पाच व्यावसायिकावर गुन्हे दाखल

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : कॉपीराईट कायद्याचे उल्लंघन करून बनावट व अनधिकृत वस्तूंची विक्री करणाऱ्यांविरोधात खेड पोलिसांनी राजगुरुनगर शहरात मोठी कारवाई केली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच व्यावसायिकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत पुमा सी कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी महेंद्र सोहन सिंग देवरा, वय 36 रा. बिरोलिया, राजस्थान यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील वाडारोड परिसरातील रेडीमेड कपडे ,तसेच चप्पल, बुटाच्या दुकानात प्रसिद्ध कंपन्यांचे ,कॉपीराइट,विना परवाना विक्री होत असल्याची तक्रारीवरून वाडा रोड येथील उमेश ट्रेडींग कंपनीचे होलसेल क्लॉथ सेंटर, साई आर्केड येथील पवार फुटवेअर हब, रॉयल होलसेल हब, सेंट्रल मेन्स हब, पहिल्या मजल्यावर असलेले होलसेल हब या व्यावसायिक दुकानावर छापे टाकण्यात आले.या दरम्यान संबंधित दुकानातून पुमा या प्रसिद्ध कंपनीचा विक्री करण्याचा परवाना नसताना हुबेहूब व्यापारचिंह,लोगो,आकार,अक्षर असणारे बनावट टि शर्ट, ट्रॅक पॅन्ट, जॅकेट, शुज, चप्पल विक्री करीत असल्याचे आढळून आले.याप्रकरणी उमेश संभाजी सातपुते,सुनील रघुनाथ पवार, आजाद रशीद मोमीन,फैजल अब्दुलगफ्फार शेख, युवान आसिफ मोमीन,सर्व राहणार राजगुरुनगर,या व्यावसायिकावर प्रतिलिपी अधिकार अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून,दुकानातील कॉपीराइट केलेला एकूण सात लाख ३८ हजार ८८६ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हि कारवाई खेड पोलिस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक महेश गरड यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार प्रवीण आढारी,महेश गोसावी,सुरज राक्षे,महिला पोलिस मिथिला मोरे यांच्या पथकाने केली. राजगुरुनगर शहरातील अनधिकृत व बनावट वस्तू विक्री प्रकरणी प्रथमच झालेल्या मोठ्या कारवाईमुळे व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहे.

### शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने दोघांना 71 लाखांचा गंडा



पुणे (दैनिक संध्या) : शेअर बाजारात जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी दोघांची ७१ लाख ७३ हजार रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी सायबर आणि भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. पहिल्या घटनेत, धनकवडी येथील ३६ वर्षीय फिर्यादी यांच्या वडिलांना एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये जोडण्यात आले. ग्रुप अ‍ॅडमिन दीपा रासीमाने हिने पाठवलेल्या लिंकवरून अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या बहाण्याने त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यांवर ६२ लाख ७० हजार रुपये जमा करण्यास भाग पाडले. मात्र, कोणताही परतावा अथवा मूळ रक्कम न मिळाल्याने सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. दुसऱ्या घटनेत, कात्रज येथील २९ वर्षीय तरुणास टेलिग्रामवर शेअर ट्रेडिंगची जाहिरात पाठवून जाळ्यात ओढण्यात आले. आरोपींनी चव्हाण यांचे ओळखपत्र व्हॉट्सअ‍ॅपवर मागवून त्यांचे एक 'इंटरनल इक्विटी अकाउंट' उघडले. याद्वारे त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यांवर नउ लाख रुपये भरण्यास भाग पाडले. कोणताही परतावा न मिळाल्याने चव्हाण यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# बेलसर टोलप्लाझा येथे सोमवारी सर्वपक्षीय आंदोलन

**पुरंदरवासीयांना पूर्णतः टोलमाफी मिळावी मासिक पास घेणार नाही**

**स्थानिकांना टोलमाफी हा त्यांचा हक्क : नगराध्यक्ष बारभाई**

स्थानिक भूमिपुत्रांनी रस्ते रुंदीकरण व विकासासाठी आपल्या व्यवसायांच्या जागा, बागायती जमिनी तसेच घरे दारे इमारती पाडून जागा दिल्या आहेत. विकासकामांसाठी योगदान देऊनही टोलधाड भूमीपुत्रावर कशासाठी? असा सवाल करत न्यायिक व संविधानिक स्वरूपाच्या आंदोलनात सहभागी असल्याचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी स्पष्ट केले.



जेजुरी (दै. संध्या) :

पुणे -पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ वरील तक्रारवाडी फाट्यानजीक असलेल्या बेलसर टोलप्लाझा येथे २०किलो मीटर परिसरातील स्थानिक भूमिपुत्र शेतकरी, कामगार, व्यावसायिक यांच्या वाहनांना पूर्णतः टोलमाफी मिळावी. मासिक पास घेण्याची सक्ती करू नये. टोलप्लाझाच्या २०किलो मीटर परिसरातील नागरिकांचे आधारकार्ड पाहून त्यांची वाहने सोडण्यात यावीत. टोलप्लाझावर व्यवस्थापन गतिमान करावे. वाहन चालकांसाठी नियामक दर्जेदार सोयी सुविधा कराव्यात आदी मागण्यांसाठी सोमवारी (दि.८) सकाळी ११वाजेपासून सर्वपक्षीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी यांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे. या अनुषंगाने जेजुरी पोलीस स्टेशन, टोलप्लाझा व्यवस्थापन कंपनी तसेच तहसीलदार कार्यालय यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जेजुरी नगर परिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप जगताप, माजी विश्वस्त शिवराज झगडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष रमेश लेंडे, मनसे तालुकाध्यक्ष उमेश जगताप, शहराध्यक्ष गणेश कुंभार, जिसा संघटनेचे अध्यक्ष विकास पवार, दादा फाऊंडेशनचे यशवंत दोडके, आरपीआयचे गौतम भालेराव, नगरसेवक योगेश जगताप, कृष्णा कुदळे, स्वप्नील हरपळे, देवेंद्र दोडके, विजय झगडे, विक्रम फाळके, आदींसह विविध संस्थांच्या कार्यकर्त्यांनी सहा.पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांचेसह टोलप्लाझा व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांशी चर्चा करीत टोलमाफी मिळण्याबाबत भूमिका स्पष्ट केली.

## दौंड तालुक्यातील पाटस येथे सराईत गुन्हेगाराकडून गोळीबार

दौंड (दै. संध्या) :

दौंड तालुका पाटस येथे यवत पोलिस स्टेशन हद्दीत आज रोजी दुपारी 2,30 वाजण्याचे सुमारास मौजे पाटस, तालुका दौंड जिल्हा पुणे गावचे हद्दीत राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक जवळील गरदडे कॉम्प्लेक्स समोर श्री. सिमेंट प्रा.ली पाटस या सिमेंट कंपनीत गाडी भरण्याचे कारणावरून श्री. संतोष बाळकृष्ण कद्दू, रा. बेटवाडी, ता. दौंड जि. पुणे व श्री सुरज कुऱ्हाडकर रा. पाटस अंबिकानगर, ता. दौंड जि. पुणे यांचेत असलेल्या व्यावसायिक वादातून दोन्ही गटातील लोक जमा होऊन त्यांचेत वाद झाला. त्यावेळी वादातून नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी व सांगली फाटा मांडवगण सराईत गुन्हेगारांनी इसमाने अग्निशस्त्रातून फायरिंग केल्याची घटना घडलेली आहे. सदर घटनेतील 08 इसमांना ताब्यात घेण्यात आले असून उर्वरित आरोपींचा शोध चालू आहे. अद्याप जखमी बाबत माहिती प्राप्त नाही. सदर घटनेबाबत यवत पोलीस स्टेशन फिर्याद दाखल करण्यात आली आहे.यामुळे नागरिकांमध्ये मोठे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे पाटस ग्रामपंचायत ची लोकसंख्या सुमारे 30000 असून या ठिकाणी अनेक बाहेर गावातील सराईत गुन्हेगारांनी आपले बस्तान मांडले आहे यामुळे गेले पाच वर्षापासून पाटस मध्ये मोठे गुन्हेगारीचे तांडव निर्माण झाले आहे पाटस पोलीस स्टेशनला प्रभारी अधिकारी नसल्यामुळे गुन्हेगारीला प्रोत्साहन मिळत असल्याचे पाटस नागरिकांतून बोलले जात आहे पाटस गावामध्ये दिवसाला कोटी रुपयाची उलाढाल होते.

## क्रिस्टोफर नोलन यांच्या 'द ओडिसी' या नवीन चित्रपटासाठी आयमॅक्स अ‍ॅडव्हान्स बुकिंग भारतात ८ जून रोजी सुरू होणार आहे.

नवी दिल्ली (दै. संध्या) :




क्रिस्टोफर नोलन यांच्या बहुप्रतिक्षित 'द ओडिसी' या चित्रपटाची वाट पाहणाऱ्या भारतीय प्रेक्षकांसाठी आनंदाची बातमी. या चित्रपटासाठी आयमॅक्स अ‍ॅडव्हान्स बुकिंग भारतात ८ जून रोजी सुरू होणार आहे. यामुळे, भारतीय प्रेक्षक चित्रपटासाठी आपल्या पसंतीच्या जागा आगाऊ बुक करणाऱ्या जगातील पहिल्या काही प्रेक्षकांपैकी असतील. हा संपूर्णपणे आयमॅक्स कॅमेऱ्यांनी चित्रित केलेला जगातील पहिला चित्रपट आहे. हा चित्रपट भारतासह जगभरातील चित्रपटगृहांमध्ये १७ जुलै, २०२६ रोजी प्रदर्शित होईल.

ऑस्कर-विजेते दिग्दर्शक क्रिस्टोफर नोलन यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. होमरच्या प्रसिद्ध महाकाव्यावर आधारित, या चित्रपटाची मोठ्या पडद्यासाठी पुनर्कल्पना करण्यात आली आहे. ही कथा इथाकाचा राजा ओडिसियसची आहे, जो ट्रोजन युद्ध संपल्यानंतर घरी परतण्यासाठी एका लांब आणि धोकादायक प्रवासाला निघतो.

या चित्रपटात मॅट डॅमन ओडिसियसची भूमिका साकारणार आहे, तर टॉम हॉलंड त्याचा मुलगा टेलीमाकस आणि अ‍ॅन हॅथवे पेनेलोपीची भूमिका साकारतील. झेंडाया, रॉबर्ट पॅटिन्सन, ल्युपिटा न्योंगो, शार्लिझ थेरॉन आणि जॉन बर्न्थोल हे देखील महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसतील. 'द ओडिसी' भारतात १७ जुलै २०२६ रोजी सर्व फॉरमॅटमध्ये प्रदर्शित होईल.

वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी इंडियाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डेन्झिल डायस यांनी सांगितले की, 'द ओडिसी' हा चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील संपूर्णपणे आयमॅक्स कॅमेऱ्यांनी चित्रित केलेला पहिला चित्रपट आहे. त्यांनी स्पष्ट केले की, हा टप्पा गाठण्यासाठी ख्रिस्तोफर नोलन यांनी जवळपास दोन दशके काम केले. त्यांनी सांगितले की, ८ जून हा भारतीय प्रेक्षकांसाठी आणि नोलनच्या चाहत्यांसाठी एक खास दिवस असेल, कारण पहिल्यांदाच त्यांना जगभरातील प्रेक्षकांसोबत एकाच वेळी चित्रपटासाठी जागा बुक करता येतील.

'द ओडिसी' चित्रपटाची आयमॅक्स तिकिटे ८ जून २०२६ पासून विक्रीसाठी उपलब्ध होतील. हा चित्रपट १७ जुलै २०२६ पासून देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल.

हा चित्रपट क्रिस्टोफर नोलन यांनी लिहिला आणि दिग्दर्शित केला आहे. याची निर्मिती एमा थॉमस आणि क्रिस्टोफर नोलन यांनी सिन्कोपी बॅनरखाली केली आहे. या चित्रपटाचे भारतात वितरण युनिव्हर्सल पिक्चर्स इंडिया आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी करणार आहेत. हा चित्रपट १७ जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल.

## डॉ. दिलीप मस्के यांची राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

हिंगोली (दै. संध्या) :




सामाजिक, वैद्यकीय व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले कळमनुरी तालुक्यातील चिंचोर्डी येथील रहिवासी असलेले उर्मिला मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलचे सर्वेसर्वा

डॉ. दिलीप मस्के (नाईक ) MBBS D Ortho यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या डॉक्टर सेलच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. हि निवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार व राज्यसभा खासदार पार्थदादा पवार यांच्या आदेशाने व प्रदेश अध्यक्ष खा सुनिल तटकरे व राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे राज्यप्रमुख बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

डॉ. दिलीप मस्के मागील 15 वर्षांपासून आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून समाजातील विविध घटकांसाठी सातत्याने वैद्यकीय सेवा व जनजागृती उपक्रम राबविले आहेत. 24 जून 2025 रोजी वंचित बहुजन आघाडीच्या हिंगोली जिल्हा उपाध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत राष्ट्रीय अध्यक्ष स्व अजितदादा पवार यांच्याहस्ते जाहीर प्रवेश केला होता त्यांच्या कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

निवडीनंतर बोलताना डॉ. दिलीप मस्के यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले. व येणाऱ्या काळात डॉक्टर सेलच्या माध्यमातून राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांना संघटित करून आरोग्यविषयक प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचा तसेच जनतेपर्यंत आरोग्य सेवा व आरोग्य शिबिर यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी पक्ष कसा बळकट करता येईल याकडे लक्ष देणार असल्याचे त्यांनी सांगितले व अधिक सक्षमपणे सरकारच्या योजना जन सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. मस्के यांच्या निवडीबद्दल विविध राजकीय, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत त्यांच्या या निवडीचा

हिंगोली जिल्ह्यासह महाराष्ट्रात राष्ट्रवादीला मोठा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. या निवडीबदल राष्ट्रवादी किसान सभा प्रदेश अध्यक्ष अ‍ॅडव्होकेट वसंत मानकर आमदार विक्रम काळे आमदार राजू नवघरे राष्ट्रवादी काँग्रेसचे हिंगोली जिल्हाध्यक्ष माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अनिलभाऊ पतंगे जिल्हा सरचिटणीस बाबुराव वानखेडे सेनगाव माजी तालुकाध्यक्ष रवींद्र गडदे किसान सभा हिंगोली जिल्हाध्यक्ष डॉ वसंत मस्के माजी उपनगराध्यक्ष नाझीम रजवी यांनी शुभेच्छा दिल्या.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे सोनावळे ता.जुन्नर जि. पुणे परिसरातील लोकांस सदरच्या नोटिसीने जाहीरपणे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही शकुंतला रमेश करडिले रा. हिवरे तर्फे नारायणगाव ता. जुन्नर, जि. पुणे यांच्या मालकीची, वहिवाटीची अशी मिळकत आहे. सदरची मिळकत ही आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबूल केले आहे, त्याबाबत आमचे अशिलांबरोबर विक्री विषयाची बोलणी झालेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी असल्याबाबत खात्री व भरवसा सदरील मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या सदरील मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, लीज, बक्षिस, खरेदी-विक्री, लीज-लिन, चोळीबांगडी, पोटगी, साठेखत, खरेदीखत, इ. स्वरूपाचे वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत खालील पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा व तशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी अशी असून सदरील मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन - तु. पुणे, पो. तु.जुन्नर, ता.जुन्नर जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती जुन्नर महसुली गाव व ग्रा. पं. सोनावळे हद्दीतील व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत –

मौजे सोनावळे येथील गट क्र. **३४४ (खाते क्र.४५०)** वरील शेतजमीन मिळकत खालीलप्रमाणे:

| गट नं. | क्षेत्र - हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| ३४४ | खाते नं.४५० वरील एकूण क्षेत्र ०० हे १६ आर पो. ख.०० हे ०४ आर शकुंतला रमेश करडिले यांचे मालकी ताबे वहिवाटीचे कायदेशिर मालकीचे संपूर्ण क्षेत्र | ०.११ |

यासी चतुःसिमा खालीलप्रमाणे:-

| पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|
| गट क्र. ३४३ | गट क्र. ३३४ | गट क्र. ३४५ | गट क्र. ३५३ |

येणेप्रमाणे वर्णनाची चतुःसिमापूर्वक मिळकत त्यामधील दगड, माती, तदंगभूत वस्तू, वहिवाटीचे व जाणे येणेचे हक्कासह इजमेंटरी मिळकत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस.

सही/-
अ‍ॅड. सचिन बा. निकम
अ‍ॅडव्होकेट
नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे

नारायणगाव
तारीख - ०४/०६/२०२६

## चाहते नेहमीच या प्रवासाचा भाग राहिले आहेत

नवी दिल्ली (दै. संध्या) :

सध्या हिंदी जीईसी वाहिन्यांमध्ये आघाडीवर असलेली झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'गंगा माई की बेटियाँ'ने पुन्हा एकदा महत्त्वाच्या निर्णयासाठी प्रेक्षकांकडे मदत मागितली आहे. प्रेक्षकांना आठवत असेल की #BringSneDhuTogether या व्हायरल हॅशटॅगद्वारे स्नेहा (अमनदीप सिधू) आणि सिद्धू (शिझान खान) यांना एकत्र येण्यासाठी त्यांनी कसा जोरदार पाठिंबा दिला होता. त्यांच्या या निस्सीम समर्थनामुळे अखेर या आवडत्या जोडीचे लग्न झाले. मात्र आता कथेला नवीन नाट्यमय वळण मिळाले आहे. सिद्धू हा दुर्गावतीचा (इंदिरा कृष्णा) मुलगा असल्याचे धक्कादायक सत्य समजल्यानंतर स्नेहा द्विधा मनःस्थितीत सापडली आहे. प्रेम आणि विश्वासघात यांच्यात अडकलेली ती आपल्या नात्याच्या भवितव्याबद्दल संभ्रमात आहे. आणि ती आपल्या या प्रवासात साथ देणाऱ्या प्रेक्षकांकडून पुन्हा एकदा मार्गदर्शन मागत आहे. प्रेक्षकांना कथेसोबत आणखी जवळून जोडण्यासाठी झी टीव्ही आणि निर्मात्यांनी अलीकडेच #SnehaKiAawaz ही खास फॅन-एंगेजमेंट मोहीम सुरू केली आहे. यात प्रेक्षकांनी मतदान करून स्नेहाने पुढे काय निर्णय घ्यावा हे ठरवण्याची संधी देण्यात आली आहे. प्रेक्षकांसमोर दोन पर्याय ठेवण्यात आले आहेत — 'रिश्ता निभाए' किंवा 'रिश्ता तोड दे'. म्हणजेच, स्नेहाने सिद्धूला माफ करून त्यांच्या नात्याला आणखी एक संधी द्यावी का, की कायमची दूर जावे हे ठरवण्याचा अधिकार प्रेक्षकांना दिला आहे.

## अधीक्षक अभियंता पदी सुरेश सवाईराम, संजय वाघमारे रुजू

पुणे (दै. संध्या) :





महावितरण पुणे ग्रामीण मंडलच्या अधीक्षक अभियंता पदी सुरेश सवाईराम पदोन्नतीने तर अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) या पदावर संजय वाघमारे बदलीद्वारे नुकतेच रुजू झाले झाले आहेत. यांचेसोबतच पुणे परिमंडलास ५ नविन कार्यकारी अभियंतेही मिळाले आहेत. मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी पुणे परिमंडलात सर्वांचे स्वागत करुन जोमाने व ग्राहकाभिमुख काम करण्याच्या सूचना दिल्या. सांगली येथील वालचंद महाविद्यालयातून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करुन सुरेश सवाईराम यांनी तत्कालिन वीज मंडळात १९९४ साली चिपळूण येथे सहाय्यक अभियंता म्हणून सेवेला सुरुवात केली. २००२ ते २०१० हातकणंगले येथे उपकार्यकारी अभियंता, २०१० ते २०१४ नाशिक येथे अति. कार्यकारी अभियंता तर २०१६ ते २०२६ या काळात नाशिक शहर विभाग-१, भांडूप शहर विभाग व सांगली ग्रामीण विभागात कार्यकारी अभियंता म्हणून त्यांनी काम केले आहे. नुकत्याच झालेल्या पदोन्नतीवर ते पुणे ग्रामीण मंडलात अधीक्षक अभियंता म्हणून ते रूजू झाले आहेत. महावितरण सांघिक कार्यालयात अधीक्षक अभियंता (अपारंपरिक ऊर्जा) या पदावर कार्यरत असलेले संजय वाघमारे पुणे परिमंडलाच्या पायाभूत आराखडा विभागात अधीक्षक अभियंतापदी नुकतेच बदलीवर रुजू झाले.

१९९९ साली वीज मंडळात सहा. अभियंतापदी वाघमारे यांची निवड झाली. त्यानंतर २००६ साली सरळ सेवेतून उपकार्यकारी अभियंता, २०१० साली अति. कार्यकारी अभियंता, २०१६ मध्ये कार्यकारी अभियंता व २०२४ साली सरळ सेवेतूनच ते अधीक्षक अभियंता झाले.


## पुणे महानगरपालिका

**फेर निविदा जाहिरात**

विक्री कालावधी दिनांक :- ०६/०६/२०२६ ते १२/०६/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
स्विकृती दिनांक :-०६/०६/२०२६ ते १२/०६/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :-१५/०६/२०२६ दुपारी ३:३० वा.


| अ. क्र. | निविदा.क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ VEHICLE /2025/180 | मोटार वाहन विभाग | पुणे महानगरपालिकेकडील वाहनांच्या दैनंदिन दुरूस्तीसाठी Twin Post Car elevator मशिन खरेदी करणे. | ४१५/- | ४,१७,०००/- | ४,१७०/- | १ वर्ष/टेंडर रक्कम संपेपर्यंत | श्री. संदीप चौगुले ९६८९९३०१२६ श्री. प्रविण वाढणे ९६८९९८५४६२ |

अ) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी/म.न.पा. मान्यता प्राप्त/शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकिट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ड) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती/प्रशिक्षण टेंडर सेल विभाग पुणे महानगरपालिका येथे मिळेल.
ई) कार्यालयीन आदेश क्र. अतीमआ (वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
मोटार वाहन विभाग
पुणे महानगरपालिका

*जाहिरात क्र. १/१८६ दि. ०५/०६/२०२६*

## थोडक्यात पण महत्वाचे...

### रहाटणी, गंगानगर परिसरातील अनधिकृत बांधकामावर महापालिकेचा 'बुलडोझर'

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. २७, मौजे रहाटणी येथील गंगानगर, रहाटणी गावठाण परिसरातील अनधिकृत बांधकामांवर आज निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाई दरम्यान एकूण ३ ठिकाणी असलेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली असून, त्यांचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे ३,२१९.४५ चौ. मी. इतके आहे. ही कारवाई आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच 'ग' क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांच्या अधिपत्याखाली पार पाडण्यात आली. कारवाईमध्ये उपअभियंता सुनील बेळगावकर, जयवंत रोकडे, प्रताप मोरे तसेच महापालिकेच्या धडक कारवाई पथकातील (अ, ब, ड व ग) एकूण १५ बीट निरीक्षक, ४० एम.एस.एफ. जवान, ०१ पोलीस उपनिरीक्षक, ०५ पोलीस कर्मचारी आणि १ जेसीबी मशीन यांच्या साहाय्याने ही मोहीम राबविण्यात आली. यासोबतच विद्युत विभाग व इतर संबंधित विभागांचे सहकार्य घेऊन ही कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. शहरातील अनधिकृत बांधकामांवर यापुढेही नियमानुसार सातत्याने निष्कासन कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### विषारी दारुकांडातील आरोपी कर्नेलसिंगच्या घरासह दारूअड्डा 'भुईसपाट'



पिंपरी (दैनिक संध्या) : फुगेवाडीतील विषारी दारुकांडानंतर प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, या प्रकरणातील आरोपी कर्नेलसिंग विरका यांच्या अनधिकृत घरासह दारू अड्ड्यावर गुरुवारी (दि.४) पिंपरी-चिंचवड महापालिकेने पाडकामाची कारवाई केली आहे. विषारी दारू विक्रीचे केंद्र ठरलेल्या या ठिकाणावर अखेर महापालिकेने हातोडा चालवला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन विभागाच्या वतीने 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या सहकार्याने संजयनगर, फुगेवाडी येथील झोपडपट्टीतील विनापरवाना झोपडीवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या संयुक्त कारवाईमध्ये सुमारे ८७५ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत झोपडीचे बांधकाम निष्कासित करण्यात आले. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली, उप आयुक्त अण्णा बोदडे व कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई राबविण्यात आली. कारवाईदरम्यान कार्यकारी अभियंता उमेश मोने, उपअभियंता संदिप पाडवी, महेंद्र देवरे, प्रशांत कोतकर, सुनिल दांगडे, सुनिल हरिदास तसेच कनिष्ठ अभियंते सतीश डांगे, अशोक पाटील, वनिता बवले, योगेश शेवलकर, विशाल नेवाळे, सुरेश लंगोटे, कल्याणी वाघमारे, धनश्री हंडे, ज्योती चांदगुडे, प्रीती बिजवे यांच्यासह बीट निरीक्षक व अतिक्रमण पथक सहभागी होते. तसेच ह क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, २० एमएसएफ जवान यांच्या उपस्थितीत तसेच ०४ ब्रेकर, ०२ गॅस कटर व सुमारे ४० मजुरांच्या सहाय्याने ही कारवाई पार पडली.

### विद्यार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी रेनकोट व गणवेश द्या; नगरसेविका ऐश्वर्या तरस

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पावसाळा सुरू होण्यापूर्वी रेनकोट आणि गणवेशाचे वाटप करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच आवश्यक सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. विशेषतः पावसाळ्यात विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांना वेळेत रेनकोट मिळाल्यास शालेय उपस्थिती वाढण्यास मदत होईल. तसेच विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी, वितरण आणि वाटपाचे नियोजन तातडीने पूर्ण करून पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांना रेनकोट व गणवेश उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. या विषयाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी व्यक्त केली आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त भाजयुमोचा हरित संकल्प

## महिनाभरात ५ हजार वृक्ष लागवडीचे लक्ष्य

पिंपरी (दै. संध्या)

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो) पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये व्यापक वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. शहरातील तब्बल ४० ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी भाजयुमोचे शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी आगामी महिनाभरात ५ हजार वृक्ष लागवड करण्याचा संकल्प जाहीर केला.

वाढते शहरीकरण, प्रदूषण आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. ही बाब लक्षात घेऊन भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शहरभर वृक्षारोपण मोहीम हाती घेण्यात आली आहे. विविध सार्वजनिक ठिकाणे, मोकळ्या जागा, शैक्षणिक परिसर तसेच नागरिकांच्या सहभागातून अनेक ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी बोलताना दिनेश यादव म्हणाले, "वृक्ष हेच जीवनाचे खरे आधार आहेत. पर्यावरणाचे संरक्षण आणि पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. केवळ वृक्ष लावणेच नव्हे तर त्यांचे संगोपन करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. भाजयुमोच्या वतीने पुढील एका महिन्यात शहरात ५ हजार वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला आहे."




या उपक्रमात भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक, युवक तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वृक्षारोपणासोबतच पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. प्लास्टिकचा वापर कमी करणे, जलसंधारण आणि हरित जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या या उपक्रमामुळे शहरातील हरित क्षेत्र वाढण्यास मदत होणार असून पर्यावरण संवर्धनासाठी युवकांची भूमिका अधिक प्रभावीपणे पुढे येत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. आगामी काळातही अशा विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती भाजयुमोच्या वतीने देण्यात आली. यावेळी शहर अध्यक्ष शत्रुघ्न बाप्पु काटे, संकेत चोंधे, दिनेश काटे, प्रसाद कस्पटे, सुमित घाटे, राजेश डोंगरे,दिपक नागरगोजे, दयानंद बडंगर, नितीन साळी, रोहीत कराळे जांलीदर काटे,आकाश पवार, ओमकार मानकर हे युवा मोर्चा पदाधिकारी उपस्थित होते.

## समृद्धी भोईरची सुवर्ण झेप; ॲथलेटिक्स स्पर्धेत चमकदार कामगिरी

पिंपरी (दै. संध्या)




पुणे विद्यापीठाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या 74 व्या महाराष्ट्र राज्य सीनियर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत पिंपरी-चिंचवडच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यामध्ये समृद्धी भोईर हिने हप्टेथलॉन प्रकारात सुवर्णपदक पटकावत आपली दमदार छाप पाडली.

हप्टेथलॉन हा सात प्रकारांचा अत्यंत आव्हानात्मक क्रीडा प्रकार असून त्यामध्ये 100 मीटर हर्डल्स, गोळाफेक, हाय जंप, 200 मीटर धावणे, ट्रिपल जंप, भालाफेक आणि 800 मीटर धावणे या स्पर्धांचा समावेश असतो. या सर्व प्रकारांमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे विजेता निश्चित केला जातो. समृद्धी भोईर हिने सातही प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सर्वाधिक गुण मिळवून सुवर्णपदकावर नाव कोरले.

तसेच, मधुरा खांबे हिने ट्रिपल जंप प्रकारात उत्कृष्ट प्रदर्शन करत रौप्यपदक पटकाविले. तिच्या या यशामुळे पिंपरी-चिंचवडच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

समृद्धी भोईर आणि मधुरा खांबे या दोन्ही खेळाडू साई स्पोर्ट्स अकॅडमी येथे सराव करतात. त्यांना सीनियर प्रशिक्षक चंद्रशेखर कुदळे आणि ज्युनिअर प्रशिक्षक ज्ञानेश्वरी कुदळे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. प्रशिक्षकांच्या मेहनतीमुळे आणि खेळाडूंच्या जिद्दीमुळे हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. या दोन्ही खेळाडूंच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पिंपरी-चिंचवड शहरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्या यश संपादन करतील, असा विश्वास क्रीडाप्रेमींनी व्यक्त केला आहे.

## उद्योगनगरीत पर्यावरणाचे वाटोळेच

पिंपरी (दै. संध्या)

'स्वच्छ शहर, सुंदर शहर' अशी ख्याती मिळवू पाहणारे पिंपरी-चिंचवड शहर हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने विकसित झालेले औद्योगिक तथा नागरी शहर आहे. वाहनउद्योग, आयटी कंपन्या, उद्योगधंदे, मोठे रस्ते, मेट्रो, उड्डाणपूल, गगनचुंबी इमारती अशा वेगवान विकासामुळे शहराचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे. मात्र, या विकासाच्या झगमगाटामागे पर्यावरणाची प्रचंड हानी झाली, हे लपून राहिलेले नाही. सद्यस्थितीत शहरातील प्रदूषणाची स्थिती गंभीर आहे. नद्यांची गटारे झाली आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड अत्यंत धोक्याच्या वळणावर आहे. नदीपात्रात हजारोंच्या संख्येने आढळून येणारे मृत मासे, नदीत साचून राहणारी जलपर्णी, फेसाळलेली नदी, थेट नदीपात्रात सोडण्यात येणारे सांडपाणी, झाडांची कत्तल, नियोजनशून्य व भ्रष्ट कारभार हीच पिंपरी-चिंचवडच्या पर्यावरणाची ओळख बनली आहे. जवळपास ३० लाख लोकसंख्या असलेल्या उद्योगनगरीचा कारभार हाकणाऱ्या महापालिकेची वायूप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन अशा सर्वच बाबतीत असणारी प्रचंड उदासीनता, समन्वयाचा अभाव, फसवी घोषणाबाजी, कामापेक्षा चमकोगिरी जास्त, ही कार्यपध्दती आणि सातत्याने होणारे टक्केवारीचे राजकारण पाहिल्यानंतर शहरात पर्यावरणासारख्या महत्त्वाच्या विषयाचे बारा वाजले आहेत.

## गॅस रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश; पोलिसांची मोठी कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड पोलिसांच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने चाकण परिसरात सुरू असलेल्या अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटचा पर्दाफाश करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल २५१ गॅस सिलेंडर, गॅस रिफिलिंगसाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि एक महिंद्रा बोलेरो टेम्पो असा एकूण ९ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांना चाकण मार्केट यार्ड परिसरातील बालाजी गॅस एजन्सीजवळ भरलेल्या घरगुती गॅस सिलेंडरमधून छोट्या सिलेंडरमध्ये बेकायदेशीरपणे गॅस भरला जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने छापा टाकून कारवाई केली. यावेळी एजन्सी मालक शुभम प्रवीण परदेशी याच्या सांगण्यावरून गॅस रिफिलिंग करणारे प्रकाश सिद्धान्ना जवलगी आणि तुषार प्रफुल्ल वाळे यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी भरलेल्या सिलेंडरमधून नोजलच्या सहाय्याने इतर सिलेंडरमध्ये गॅस भरत असल्याचे पोलिस तपासात समोर आले. या बेकायदेशीर प्रकारामुळे मोठा स्फोट किंवा आग लागून नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी सांगितले. कारवाईदरम्यान २५१ गॅस सिलेंडर, वजन काटा, नोजलसह गॅस रिफिलिंग साहित्य आणि महिंद्रा बोलेरो टेम्पो जप्त करण्यात आला. याप्रकरणी चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८७/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता कलम २८७, २८८ तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ आणि स्फोटक पदार्थ अधिनियम १९०८ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## 'ग्रीन आणि सस्टेनेबल' पिंपरी-चिंचवडसाठी लोकचळवळ उभारणार

पिंपरी (दै. संध्या)

■ जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, वृक्षसंवर्धनाचा संकल्प




औद्योगिक शहर म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडचा चेहरामोहरा बदलताना आता हे शहर 'ग्रीन आणि सस्टेनेबल सिटी' करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधत, येणाऱ्या पिढीसाठी 'शुद्ध हवा आणि प्रदूषणमुक्त भविष्य' देण्यासाठी प्रत्येक नागरिकाने यात योगदान द्यावे. केवळ वृक्षारोपण न करता, त्या झाडांचे संवर्धन करत या मोहिमेला आता 'लोकचळवळ' बनवा," असे आवाहन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून, पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या 'एक पेड माँ के नाम' आवाहनानुसार बारा घोलप महाविद्यालय परिसर आणि सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानिमित्त आमदार जगताप बोलत होते. यावेळी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी महापौर माई ढोरे, नगरसेवक नवनाथ जगताप, हर्षल ढोरे, ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप, नगरसेविका पल्लवी जगताप, तृप्ती कांबळे, रवीना आंगोळकर, तसेच दुर्गाकौर आदियाल, महामंत्री मधुकर बच्चे, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे यांच्यासह पक्षाचे विविध मंडल अध्यक्ष, बूथ प्रमुख, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. या निमिताने वृक्षसंवर्धन, जतन आणि पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्यात आली.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले की, "झाड लावणे ही केवळ एक औपचारिकता नसून, ती भविष्यासाठी केलेली सामाजिक गुंतवणूक आहे. ही मोहीम आता शहरातील प्रत्येक गृहनिर्माण सोसायटी आणि घराघरापर्यंत पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. नागरिकांनी दत्तक घेतलेले एक झाड, हीच या मोहिमेची खरी यशस्विता असेल." आधुनिक तंत्रज्ञान आणि निसर्ग यांचा मेळ घालत पिंपरी-चिंचवडला स्मार्ट आणि शाश्वत शहर म्हणून विकसित करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

> "पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील 'शाश्वत विकास' आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडचा चेहरामोहरा बदलण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. शहराचा औद्योगिक विकास साधताना पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड दत्तक घेऊन वृक्षारोपण मोहिमेचे एका मोठ्या लोकचळवळीत रूपांतर करावे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांना गती देत, निसर्गाच्या सोबतीने पिंपरी-चिंचवडला एक 'ग्रीन आणि सस्टेनेबल सिटी' बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> **– आमदार शंकर जगताप (चिंचवड विधानसभा मतदारसंघ)**

# 'हरित पिंपरी चिंचवड' आणि 'माझी वसुंधरा ७.०' अभियानाचा उत्साहात शुभारंभ

## दुर्गादेवी टेकडीच्या उभारणीतील शिल्पकारांचेही करण्यात आले स्मरण

पिंपरी (दै. संध्या)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड शहराचे वैभव असलेल्या दुर्गादेवी टेकडी सारख्या विविध ठिकाणी पाच लाख झाडे लावून ती जगविण्याचा निर्धार आज महापालिकेने केला आहे, यानिमित्ताने पिंपरी चिंचवड शहर अधिक हिरवेगार, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त दुर्गाटेकडी येथे मान्यवरांच्या हस्ते १,००० देशी रोपांची लागवड करून 'हरित पिंपरी-चिंचवड शहर' आणि 'माझी वसुंधरा' अभियानाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला,त्यावेळी महापौर रवि लांडगे बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ पर्यावरणप्रेमी विजय जगताप लिखित 'दुर्गा टेकडीचा ५० वर्षांचा इतिहास' या माहितीपूर्ण पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे, आमदार अमित गोरखे, उमा खापरे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्या शैलजा मोरे, अरूणा लंगोटे, नगरसदस्य कुशाग्र कदम, नीलेश नेवाळे, अमित गावडे, निलेश तरस, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, मनोज सेठीया यांच्यासह भारतीय लष्कराचे ब्रिगेडीअर प्रकाश भारती, कर्नल अनिल फाटक, पोलीस उपआयुक्त विक्रम देशमुख, जुन्नर येथील वृक्षमित्र प्रकाश करमाळे, सामाजिक कार्यकर्ते अमोल भोंडवे, प्रा.नामदेव जाधव यांच्यासह नागरिक, पर्यावरण प्रेमी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निगडी प्राधिकरण येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृह ते दुर्गादेवी टेकडी दरम्यान १० किलोमीटर अशी सायकल फेरी आयोजित करण्यात आलेली होती यामध्ये महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांच्यासह शेकडो सायकलपटू सहभागी झाले होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, झाडांची केवळ लागवड करणे पुरेसे नाही, तर त्यांची योग्य निगा राखणे आणि त्यांना जगविणे हे प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. सामाजिक बांधिलकीतून शहर स्वच्छ ठेवणे, कचरा न करणे आणि पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी देखील आहे.

आमदार अमित गोरखे म्हणाले,



वृक्ष लावणे हे आपले आद्य कर्तव्य आहेच, परंतु त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणे आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येकाने आपण लावलेले किमान एक झाड पूर्णपणे जगविण्याचा संकल्प केला पाहिजे.

आमदार उमा खापरे म्हणाल्या, पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येक नागरिकाने स्वतःहून झाडे लावून दुस-यांनाही झाडे लावण्यासाठी पुढाकार घेण्यास सांगायचे आहे,जेणेकरून पर्यावरण संवर्धनास हातभार लावण्यास मदत होईल.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, दुर्गा टेकडी हे केवळ एक उद्यान नसून पिंपरी चिंचवड शहराचे अमूल्य नैसर्गिक रत्न आहे. 'दुर्गा' या नावातच सामर्थ्य आणि ऊर्जा दडलेली असून ही टेकडी नागरिकांना सकारात्मक ऊर्जा, प्रेरणा आणि निसर्गाशी जोडणारी महत्त्वाची जागा आहे. या टेकडीचे वैभव घडविण्यात अनेक घटकांचे योगदान आहे. तिचे पावित्र्य, स्वच्छता आणि नैसर्गिक संतुलन राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. दुर्गा टेकडीला देशपातळीवर एक प्रमुख प्रेक्षणीय स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. त्याचबरोबर यावर्षी शहरातील वृक्षाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

निगडी येथील ओसाड आणि खडकाळ टेकडीचे रूपांतर आजच्या नयनरम्य 'दुर्गादेवी टेकडी उद्यानात' करणाऱ्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पहिल्या पिढीतील शिल्पकारांच्या योगदानाचाही यावेळी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला. महानगरपालिकेचे पहिले प्रशासक हरनामसिंग, माजी अतिरिक्त आयुक्त रोहिदास कोंढे आणि तत्कालीन मुख्य उद्यान अधीक्षक शांताराम भोंडवे यांच्या दूरदृष्टी आणि अथक परिश्रमांमुळेच हे विस्तीर्ण हरित वैभव उभे राहिले. त्यांनी केवळ प्रशासकीय जबाबदारी म्हणून नव्हे, तर एक सामाजिक कर्तव्य म्हणून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या टेकडीवर लाखो वृक्षांचे जतन करून शहराला ऑक्सिजन हब मिळवून दिला. त्यांच्या याच ऐतिहासिक कार्याचा वारसा पुढे चालवत महापालिकेने आता ५ लाख वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे.

### उपस्थितांनी घेतली माझी वसुंधरा शपथ

"आम्ही भारताचे सुजाण नागरिक शपथ घेतो कि, आम्ही या भारत मातेला, या वसुंधरेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न करू, या वसुंधरेला,या पर्यावरणाला आमच्यापासून कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घेऊ, या देशाला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आम्ही कटीबध्द राहू व आमच्याकडून पर्यावरणाला त्रास होईल असे कोणतेही काम आम्ही करणार नाही, जास्तीत जास्त झाडे लावून या देशाला या वसुंधरेला स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्रदुषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न करू" अशी शपथ यावेळी सर्व उपस्थितांनी घेतली. शपथेचे वाचन व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# जुन्नरमध्ये बनावट विदेशी मद्यसाठा जप्त

**नारायणगाव (दै. संध्या)**



जुन्नर आणि परिसरात बनावट विदेशी मद्याची वाहतूक आणि साठा करणाऱ्या एका रॅकेटचा राज्य उत्पादन शुल्क विभागाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका मुख्य आरोपीसह त्याला रिकाम्या बाटल्या पुरवणाऱ्या भंगार विक्रेत्यालाही अटक करण्यात आली आहे.

उत्पादन शुल्क विभागाच्या नारायणगाव पथकाने या कारवाईत बनावट दारू, रिकाम्या बाटल्या, बुचे आणि एक वॅगनार कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी गोविंद शंकर जाधव राहणार निरगुडे, ता. जुन्नर, जि. पुणे असे अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेंद्र देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त सागर धोमकर आणि अध्यक्ष अतुल कानडे यांच्या आदेशानुसार, ३० मे रोजी नारायणगाव विभागाचे पथक अवैध मद्य विरोधी गस्त घालत होते. यावेळी जुन्नर-गणेशखिंड रोडने एका कारमधून बनावट दारूची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली.

अधिकाऱ्यांनी गणेशखिंड रोडवर सापळा रचला. जुन्नरकडून येणारी संशयास्पद वॅगनार कार क्र. MH 01 AX 2884 थांबवून पंचांसमक्ष तिची झडती घेतली असता, त्यात चंदीगड राज्य निर्मितीचे लेबल असलेला बनावट विदेशी मद्याचा साठा आढळला.

आरोपी गोविंद जाधव याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता, त्याने शिरोली खुर्द येथील त्याच्या जागेची माहिती दिली. उत्पादन शुल्क विभागाने तात्काळ शिरोली खुर्द येथे छापा टाकला.

या छाप्यात बनावट दारू तयार करण्याचे साहित्य आणि मोठा साठा जप्त करण्यात आला.

इम्पिरियल ब्लू व्हिस्की: १८० मिलीच्या ६० सीलबंद बनावट बाटल्या, रॉयल स्टॅग व्हिस्की: १८० मिलीच्या १७३ सीलबंद बनावट बाटल्या, युके नं. १ व्हिस्की : ७५० मिलीच्या ९६ सीलबंद बनावट बाटल्या, मोठ्या प्रमाणावर बनावट बुचे, लेबल्स आणि रिकाम्या बाटल्या,एक वॅगनार कार आणि वनप्लस कंपनीचा मोबाईल. इत्यादी वस्तू जप्त करण्यात आल्या.

आरोपी गोविंद जाधव याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ आणि भारतीय न्याय संहिता-२०२३ (BNS) च्या कलम १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीला सुरुवातीला दोन दिवसांची पोलीस कोठडी आणि नंतर १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावल्याने त्याला येरवडा मध्यवर्ती कारागृहात नेण्यात आले.

आरोपीला बनावट दारू भरण्यासाठी रिकाम्या बाटल्या पुरवणाऱ्या भंगारविक्रेत्याचा शोध घेऊन त्यालाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

पुण्याचे अध्यक्ष आणि शिरूर विभागाचे उपाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली नारायणगावचे निरीक्षक शरद जाधव, दुय्यम निरीक्षक सौरभ आवटे, समृद्धी निकम, सहाय्यक दुय्यम निरीक्षक दयानंद माने तसेच जवान निलेश केदार, दिलीप केकरे, प्रियांका झांज आणि गणेश वाव्हळ यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक सौरभ आवटे करत आहेत.

## अधिक मास निम्मित स्वामी समर्थ मठात फराळाची आरास

**जेजुरी (दै. संध्या)**



महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाच्या गडाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावाकाठी असणाऱ्या श्री स्वामी समर्थ मठात गुरुवार दिनांक 4 रोजी अधिक मास निमित्त फराळाची आरास करण्यात आली. श्री स्वामीमय सेवा ट्रस्टच्या वतीने होळकर तलावाकाठी भव्य स्वामी समर्थ मठ उभारण्यात आला असून या मठात गुरुवार,पौर्णिमा,दसरा,रामनवमी व विविध सण दिवशी विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात येतात. अधिक मास गुरुवार निमित्त स्वामी भक्तांच्या वतीने महाराजांना अनारसे, म्हैसूरपाक, बत्तासे आणि पुरणाचे दिंडे [ धोंडे ] व बालूशाही असा नैवेद्य करण्यात आला तसेच बत्ताशांचा हार अर्पण करण्यात आला .तसेच भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. श्री स्वामीमय सेवा अन्नछत्र सेवा ट्रस्टचे अध्यक्ष गणेश मोरे, उपाध्यक्ष माऊली खोमणे, पुजारी हेंद्रे मामा व स्वामी भक्तांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## पाच कंदील चौकाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे

**शिरूर (दै. संध्या)**



शिरूर शहरातील ऐतिहासिक पाच कंदील चौकाचे सध्या नूतनीकरणाचे काम चालू असून या पाच कंदील चौकस स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्यावे अशी मागणी तसेच महाराष्ट्र केसरी रघुनाथ दादा पवार यांचा यथोचीत सन्मान शिरूर नगर परिषदेने करावा अशी मागणी मातोश्री प्रतिष्ठानच्या वतीने नगराध्यक्ष ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांना निवेदन देऊन करण्यात आली.

यावेळी मातोश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभिजीत आंबेकर महिला बालकल्याण समितीच्या सभापती आयेशा कलीम सय्यद नगरसेवक अभिजीत पाचर्णे आधी उपस्थित होते. यावेळी मातोश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष यांनी सांगितले की 19 86 मध्ये शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची सभा शिरूर शहरातील चौकात झाली होती व या पाच कंदील चौकात अनेक नेत्यांच्या सभा झाल्या असल्या तरी या चौकाला बाळासाहेब ठाकरे यांच्या सभेने एक नवीन स्वरूप दिले त्यामुळे या चौकाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्यावे ही मागणी जानेवारी 2025 रोजी मातोश्री प्रतिष्ठानच्या वतीने मुख्याधिकारी यांच्याकडे करण्यात आली होती तसेच शिरूर शहरातील नामवंत मल्ल महाराष्ट्र केसरी रघुनाथ दादा पवार यांनी भारतासाठी सुवर्णपदक मिळवून दिले तसेच अनेक कुस्ती क्षेत्रात अनेक मल्ल घडवले आणि महाराष्ट्र केसरीचा पुणे जिल्ह्यातील पहिला मान रघुनाथ दादा पवार यांना मिळाला असून त्यांनी शिरूर शहराचे नाव देशात पोहोचवले असून पन्नास वर्षांपूर्वी मिळालेले पदक हे शिरूर शहरासाठी कौतुकास्पद असून त्यामुळे शिरूर शहराच्या वतीने शिरूर नगर परिषदेने त्यांचा यथोचीत सत्कार करावा अशी मागणी या वेळी करण्यात आली.

तसेच यासाठी नगर परिषदेने ठराव करावा यासाठी व या ठरावाला पाठिंबा देण्यासाठी भाजपचे शहराध्यक्ष व नगरसेवक नितीन पाचर्णे यांना सुद्धा मातोश्री प्रतिष्ठानच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सिद्धबेट परिसरात वृक्षारोपण

### वृक्षसंवर्धनाची चळवळ लोकसहभागातून अधिक व्यापक करणे आवश्यक : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

**आळंदी (दै. संध्या)**

"वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यामुळे पर्यावरण संवर्धन ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केल्यास भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण मिळू शकेल, वृक्षसंवर्धनाची चळवळ लोकसहभागातून अधिक व्यापक करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत पोपटराव कुऱ्हाडे यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आळंदी नगरपरिषदेच्या वतीने सिद्धबेट परिसरात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. पर्यावरण संवर्धन व हरित आळंदीच्या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या प्रसंगी उपनगराध्यक्षा सुजाता कालिदास तापकीर, मुख्याधिकारी माधव खांडेकर तसेच नगरपरिषदेचे नगरसेवक सचिन गिलबिले, सागर कुऱ्हाडे, सुनील घुंडरे, संतोष रासकर, दिनेश घुले, संदीप रासकर, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, पुजा घुंडरे, ऋतुजा तापकीर, अक्षय कुऱ्हाडे, कालिदास तापकीर, रवींद्र चव्हाण, अनिकेत तापकीर तसेच अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करून नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. संतभूमी आळंदीतील पावन व ऐतिहासिक सिद्धबेट परिसरात झालेल्या या वृक्षारोपण उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला नवी दिशा मिळाली आहे.

हरित क्षेत्रवाढ, स्वच्छता आणि शाश्वत विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन आळंदी नगरपरिषद भविष्यातही विविध लोकहितकारी पर्यावरणपूरक उपक्रम राबविणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## रोहित्र चोरीस जाण्याच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त

**चाकण (दै. संध्या)**



ग्रामीण भागात महावितरणचे रोहित्र अर्थात ट्रान्सफॉर्मर चोरीस जाण्याच्या वाढत्या घटनांमुळे शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रोहित्र चोरीला गेल्यानंतर नवीन रोहित्र मिळण्यासाठी पोलीस तक्रार, शाखा अभियंत्यांचा अहवाल आणि इतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. अनेकदा वीजपुरवठा पूर्ववत होण्यास विलंब होत असून, शेती पंपांसह वाड्या - वस्त्यांवरील नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. काही ठिकाणी चोरीच्या गुन्ह्यांची संख्या वाढू नये या कारणास्तव पोलीस यंत्रणेकडून तक्रार नोंदविण्यास टाळाटाळ होत असल्याने रोहित्र उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया आणखी लांबते. परिणामी ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांना अनेक दिवस अंधारात राहावे लागते. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सदस्या सुनिता शरद बुट्टे - पाटील यांनी स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय यापूर्वीच उपस्थित केला होता.

> "रोहित्र चोरीच्या घटनांमध्ये तक्रार नोंदणी आणि अहवाल प्रक्रियेतील अडथळे दूर होण्यासाठी प्रशासनाने सहकार्य केल्यास महावितरणकडून नवीन रोहित्र तातडीने उपलब्ध होऊ शकते."
> **- मंगेशभाऊ कांडगे, नगरसेवक, चाकण.**

## भूमाफीयांच्या धाडसामुळे फोफावला; बेकायदा प्लॉटिंग व्यवसाय

**चाकण (दै. संध्या)**

भूमाफीयांच्या धाडसामुळे चाकण परिसरात बेकायदा प्लॉटिंग व्यवसाय फोफावला असून, यामध्ये सर्वसामान्य शेतकऱ्यांची फरपट वाढली आहे.

पूर्वीचे चाकण आणि आजचे चाकण यात खूप मोठा बदल झालेला आहे. दुसऱ्याच्या टाळूवरील लोणी खाऊन अशिक्षित शेतकऱ्यांना फसवत

अल्पावधीत बक्कळ पैसा मिळवण्याचे प्रयत्न होत आहेत. चाकणसह संपूर्ण खेड तालुक्यात बेकायदा प्लॉटिंगचा धुमाकूळ सुरू आहे. खेड तालुक्याच्या पूर्व पश्चिम पट्ट्यात प्लॉटिंगच्या नावाखाली

**चाकण भागातील स्थिती**

फसवणुकीचे प्रकार प्रचंड वाढले आहेत. मृत माणसाला जिवंत दाखवून फसवणूक होत असल्याने शेतकरी तसेच कामगार वैतागले आहेत. कुठल्याही प्रकारची शासकीय परवानगी न घेता शेत जमिनीचे नियमबाह्य तुकडे करून त्यांची निवासी प्लॉट म्हणून विक्री करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. लक्ष विचलित करणाऱ्या आकर्षक जाहिराती आणि कमी किमतीच्या अमिषाला बळी पडून गुंतवणूक करणाऱ्या शेतकरी, कामगार, स्थानिक नागरिकांची मोठी आर्थिक फसवणूक होऊ लागली आहे. प्लॉटिंग खरेदीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात मांडवली होत असल्याने नको त्यांचे हात ओले होऊ लागले आहेत.

चाकण भागातील नाणेकरवाडी, खराबवाडी, रासे, भोसे, वडगाव घेनंद, वाकी, शेलगाव, कडाचीवाडी, म्हाळुंगे इंगळे, खालुंब्रे, येलवाडी, सावरदरी, वराळे, आंबेठाण, बिरदवडी, मुटकेवाडी, ठाकूर पिंपरी, शिवे, शेलपिंपळगाव, वडगाव पाटोळे, कोयाळी, निघोजे, आगरवाडी, पठारवाडी, कुरुळी, चिंबळी, दत्तवाडी, कानेवाडी, भिवरेवाडी, बहुळ, साबळेवाडी, चिंचोशी आदी ठिकाणी बिनशेती अर्थात एनए प्लॉटची मंजुरी न मिळवता रस्ते, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधा आहेत की नाही, याची खात्री केली जात नाही. मूलभूत सुविधांची वानवा असतानाही सुविधांची पूर्तता न करताच प्लॉटची बिनदिक्कतपणे विक्री केली जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे व्यवहार पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रे अपूर्ण असल्याचे अथवा एकाच प्लॉटची अनेकांना विक्री केल्याचे प्रकार चव्हाट्यावर आल्याने काहींनी आपले जीव गमावले आहेत. चाकण लगतच्या चिंबळी येथे प्लॉट खरेदीत फसवणूक झाल्याने चक्क एका नागरिकाने आत्मदहनाचा प्रयत्न केला. नशीब बलवत्तर म्हणून त्याच्यावर रुग्णालयात तातडीने उपचार करण्यात आल्याने बालंबाल तो बचावला.

खेड तालुक्यातील महसूल विभाग, नगरपरिषद आणि स्थानिक ग्रामपंचायतीकडे याबाबत भरपूर तक्रारी आल्या आहेत. धक्कादायक म्हणजे प्रशासनाकडून कारवाईचा वेग खूपच मंदावल्याने चाकण पंचक्रोशीत भूमाफियांचे धाडस वाढले आहे.

> "प्लॉट खरेदी करण्यापूर्वी नागरिकांनी सातबारा, फेरफार व एनए याबाबत परवानगी आहे की नाही, याची सखोल पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे. फसवणूक टाळण्यासाठी वेळीच सावध होणे गरजेचे आहे."
> **- डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद**

> "प्लॉटचा लेआउट व पीएमआरडीएची मंजुरी असणे अपेक्षित आहे. कागदपत्रांची पूर्तता व लेआउट मंजूर असल्याशिवाय प्लॉट खरेदी करण्याचे टाळावे. भू- माफियांपासून सावध राहणे हिताचे वाटते. कायदेशीर मंजुरी असलेल्या प्लॉटची खरेदी करणे फायदेशीर आहे."
> **- प्रशांत बेडसे पाटील, तहसीलदार खेड**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नारायणगावात वृक्षारोपण

नारायणगाव (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गुरुवर्य रा.प. सबनीस विद्या मंदिराच्या परिसरात पिंपळ, उंबर, जांभूळ, कौट, चिंच, कडूलिंब झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. सदर वृक्षारोपण जुन्नर वनविभाग उपवन्यसंरक्षक प्रशांत खाडे, जुन्नर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वनपाल सौ हिंगणे मॅडम, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार आपदा मित्र सुशांत भुजबळ, रेस्क्यू टीम सदस्य शंतनू डेरे, आदित्य डेरे, गुरुवर्य रा.प. सबनीस विद्या मंदिरातील उपमुख्याध्यापिका मानसी भालेराव, पर्यवेक्षिका अनुपमा पाटे, आशिष कोल्हे व सर्व सेवक वर्ग यांच्या उपस्थितीत करण्यात आले. वृक्षारोपण केलेल्या झाडांची शाळेच्या माध्यमातून योग्य काळजी घेतली जाणार आहे. या वृक्षारोपण कामी नारायणवाडी येथील शेतकरी गणेश मेहेत्रे यांनी स्वतः तयार केलेली रोपे मुलाच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यासाठी पोलीस पाटील सुशांत भुजबळ यांच्याकडे दिली होती. मुलाच्या वाढदिवसानिमित्त राबवलेल्या या उपक्रमाचा इतरांनी आदर्श घ्यावा व जास्तीत जास्त वृक्षारोपण करावे असे आवाहनही उपस्थित मान्यवरांनी यावेळी केले.



### अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने केतन निकाळजे यांस पुरस्कार

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित ३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन 'लोकनेते अजितदादा पवार साहित्यनगरी धाराशिव' येथे सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.नंदकुमार राऊत यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष आमदार कैलास पाटील उपस्थित होते. संमेलन यशस्वी करण्यासाठी संमेलनाचे मुख्य संयोजक ज्ञानेश्वर पतंगे, परमेश्वर पालकर, तुकाराम गंगावणे यांनी अथक परिश्रम घेतले. यावेळी हवेली तालुक्यातील अष्टापुर येथील पंचशील प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष केतन निकाळजे यांस आदर्श युवा कार्यकर्ता पुरस्कार अखिल भारतीय साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे व आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी पुरस्कार प्राप्त केतन निकाळजे म्हणाला की, मी अत्यंत छोटासा कार्यकर्ता आहे. माझ्या आई - वडिलांच्या व सहकारी मित्र परिवाराच्या आदर्श संस्काराने जेवढं चांगले काम करता येईल तेवढं करण्यासाठी आयुष्यभर कटिबद्ध राहिल माझ्या कामाची दखल घेऊन मला पुरस्कार दिला याबाबत अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा मी ऋणी आहे.

### पावसामुळे वीज यंत्रणेचे नुकसान

नारायणगाव (दैनिक संध्या) : नारायणगाव व वारूवाडी परिसरात मंगळवारी दुपारी झालेली गारपीट आणि वादळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. नारायणगाव व आसपासच्या परिसरामध्ये नुकत्याच झालेल्या मुसळधार वादळी पाऊस आणि गारपिटीमुळे महावितरणचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक भागांत सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विजेचे खांब व झाडे उन्मळून पडली आहेत आणि वीज वाहक तारा तुटून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. महावितरण'चे २० लाख तर जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे ३८ लाख रुपयांचे नुकसान झाले असून, शेती पिकांचेही नुकसान झाले आहे.अनेक ठिकाणी तारा तुटून व खांब पडून वीज वितरण व्यवस्था विस्कळीत झाली आहे. मंगळवारी दुपारी अडीच ते साडेचार च्या दरम्यान सुमारे ७० मिमी पावसाची नोंद झाली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे महावितरण यांचे २० पोल आणि सात हजार ६०० फूट वीजवाहिन्या तुटून पडल्यामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा खंडित झाला असून तो पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती अभियंता बी. एस .बिराजदार यांनी दिली. वारूळवाडी येथे तुटलेल्या वीज वाहिनीच्या तारेचा स्पर्श झाल्यामुळे ५ मेंढ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बाजार समितीचे पाच शेड भुईसपट झाल्याने लिलाव आता टोमॅटो उपबाजार आवारात होतील ,असे सभापती संजय काळे यांनी सांगितले .महसूल विभागाचे नुकसानीचे पंचनामे सुरू केले आहेत. वादळाचा फटका विजेच्या खांबांसह द्राक्ष, आंबा, टोमॅटो आणि कांदा यांसारख्या पिकांना बसला आहे.तारा तुटल्यामुळे गावातील व परिसरातील वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. याआधीही परिसरात अपुऱ्या दाबाने आणि खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयासमोर आंदोलन केले होते. लाखो रुपयांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांनी तातडीने भरपाई देण्याची मागणी केली आहे.

### खव्याच्या बॅगांमुळे परिसरात दुर्गंधी

नारायणगाव (दैनिक संध्या) : पुण्यातील शिरूर तालुक्यातील शिरसगाव काटा येथे नुकतीच धक्कादायक घटना समोर आली आहे. राज्यभर सुरू असलेल्या अन्न भेसळविरोधी मोहिमेच्या धास्तीमुळे व दंडात्मक कारवाईच्या भीतीने एका व्यक्तीने तब्बल ३५० किलो खवा रस्त्याच्या कडेला फेकून दिला, ज्यावरून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संशय आहे.अन्न व औषध



प्रशासनाचे राज्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे भेसळखोरांमधे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, छापांच्या धास्तीनेच हा खवा टाकून दिला गेला असावा, अशी जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे. शिरसगाव काटा येथील राष्ट्रीय महामार्ग ५४८- डी लगत असलेल्या शेतकरी विजय वामन काटे यांच्या गट क्रमांक ६ मधील शेताशेजारील कॅनॉल रस्त्याच्या कडेला अज्ञात व्यक्तींनी खव्याच्या १४बॅगा टाकून दिल्या. प्रत्येक बॅगेचे वजन सुमारे २५ किलो असल्याने एकूण खव्याचे वजन अंदाजे ३००ते ३५० किलो इतके असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. बुधवारी सकाळी परिसरात तीव्र दुर्गंधी पसरल्याने विजय काटे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी रस्त्यालगत खाव्याच्या बॅगांचा मोठा ढीग पडलेला दिसून आला. खव्याची झालेली नासाडी त्यातून येणारा उग्र वास आणि त्याची स्थिती पाहता हा माल दोन ते तीन दिवसांपूर्वी येथे फेकण्यात आला असावा, असा प्राथमिक अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकारची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्न भेसळीसारख्या गंभीर प्रकारांमुळे नागरिकांच्या आरोग्याची थेट खेळ होत असल्याने प्रशासनाने या प्रकारचा तपास करून सत्य बाहेर आणावे , अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

## थोडक्यात पण महत्वाचे



### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी दिल्ली येथील कस्तुरबा मार्ग स्थित 'महाराष्ट्र सदन' येथे मोठ्या उत्साहात आज वृक्षारोपण करण्यात आले. महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव डॉ. श्वेता सिंघल यांच्या हस्ते पर्यावरणपूरक वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे, व्यवस्थापक प्रमोद कोलापते, निवासी उपअभियंता जमुनाप्रसाद गंगवार यांच्यासह सदनातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### नियमित दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ अंतर्गत नियमित दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून विद्यार्थ्यांना ६ जून ते ९ जून २०२६ या कालावधीत नवीन नोंदणी, अर्जातील दुरुस्ती तसेच कनिष्ठ महाविद्यालयांच्या पसंतीक्रमाची नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिली आहे. राज्यातील अकरावी प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत १२ लाख ५१ हजार २५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून ४ लाख ५१ हजार ५२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. आता नियमित दुसऱ्या फेरीची प्रक्रिया ६ जूनपासून सुरू होणार आहे.

### 'दिलखुलास' कार्यक्रमात आसावरी यांची मुलाखत

मुंबई (दैनिक संध्या) : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात 'जागतिक पर्यावरण दिनानिमित्त' विशेष भागाचे प्रसारण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. हा कार्यक्रम शनिवार ६ आणि सोमवार ८ जून रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन आणि 'न्यूज ऑन एआयआर' ॲपवर प्रसारित केला जाणार आहे. ही मुलाखत कोल्हापूर विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक वृषाली पाटील यांनी घेतली आहे.



# आरे परिसरात समृद्ध, प्रेरणादायी जंगल निर्माण करणार

## मंत्री ॲड. आशिष शेलार : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ८० एकर जागेत ५ लाख वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ

■ मुंबई (दै. संध्या)


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या 'हरित महाराष्ट्र – ३०० कोटी वृक्षारोपण' मोहिमेअंतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचा संकल्प करण्यात आला आहे. याअंतर्गत आरे परिसरातील तब्बल ८० एकर रिक्त जागेत ५ लाख वृक्षलागवड करण्यात येणार आहे. आरेला कागदावर जंगल म्हणून ओळख मिळाली होती; आता ती केवळ नोंदीपुरती न ठेवता प्रत्यक्षात हिरवाईने बहरलेले, समृद्ध आणि भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी असे जंगल निर्माण करणार असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत आरे कॅम्प परिसरात



वृक्षारोपण पार पडले. यावेळी आमदार मुरजी पटेल, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, प्रभाग समिती अध्यक्ष प्रकाश मुसळे, विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. 'हरित महाराष्ट्र' मोहिमेच्या अनुषंगाने ॲड. शेलार यांनी आरे कॅम्प, मेट्रो कारशेड परिसरातील रिक्त जागा, मेट्रो भवनाच्या राखीव जागा, राष्ट्रीय डेअरी विकास मंडळ परिसर, कृषी उद्योग विकास महामंडळ, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ८, फोर्स वन, महानंद डेअरी; तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालय परिसराची पाहणी केली. या पाहणीनंतर मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने तयार केलेल्या अहवालानुसार या विविध ठिकाणी मिळून सुमारे ८० एकर जागा वृक्षारोपणासाठी उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले. मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी ही मोहीम केवळ वृक्षारोपणापुरती मर्यादित नसून भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवागार वारसा निर्माण करण्याचा व्यापक उपक्रम असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी यावेळी नमूद केले. या मोहिमेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जीआयएस आधारित नियोजन, डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली आणि वृक्षसंवर्धनासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात येणार आहे. प्रत्येक वृक्षाची वाढ, त्याचे संवर्धन आणि टिकाव यावर सातत्याने लक्ष ठेवले जाणार आहे. याशिवाय पारंपरिक वृक्षारोपण पद्धतीसोबतच घनदाट, स्वयंपोषक आणि जैवविविधतेने समृद्ध शहरी जंगले निर्माण करण्यासाठी मियावाकी पद्धतीचाही अवलंब करण्यात येणार आहे. पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि शाश्वत विकास यांचा समन्वय साधत मुंबई उपनगराला अधिक हिरवे, अधिक सुंदर आणि अधिक पर्यावरणपूरक बनविण्याचा संकल्प यामागे असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी स्पष्ट केले.

# राजकारणातील सुसंस्कृत, विकासाभिमुख नेतृत्व हरपले – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

माजी मंत्री अनंतराव थोपटे यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून श्रद्धांजली





■ मुंबई (दै. संध्या)

ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातील एक सुसंस्कृत, अभ्यासू आणि विकासाभिमुख नेतृत्व हरपल्याची शोकभावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, "अनंतराव थोपटे यांनी दीर्घकाळ भोर मतदारसंघाचे प्रभावी नेतृत्व केले. सहा वेळा आमदार म्हणून निवडून येत त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला. राज्य मंत्रिमंडळात विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी ग्रामीण विकास, शेती, पायाभूत सुविधा आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत सातत्याने कार्य केले. त्यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात त्यांनी लोकसंग्रह, साधेपणा आणि जनसेवा ही मूल्ये जपली. ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे व्यक्तिमत्त्व हे संयमी, सर्वसमावेशक आणि लोकहिताला प्राधान्य देणारे होते. विविध राजकीय पक्षांतील नेत्यांशी त्यांनी जपलेले स्नेहसंबंध आणि राजकारणातील सभ्य परंपरा कायम स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने केवळ भोर तालुक्याचेच नव्हे, तर पुणे जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. थोपटे कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, ही प्रार्थना करते, असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

# कौशल्यसंपन्न मानव संसाधनाची निर्मिती हीच काळाची गरज – मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

विकसित भारत २०४७चे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्यसंपन्न आणि तंत्रज्ञानसज्ज मानव संसाधनाची निर्मिती करणे अत्यावश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग यासारख्या नवतंत्रज्ञानामुळे रोजगार क्षेत्राचे स्वरूप झपाट्याने बदलत असून, या बदलांना सामोरे जाण्यासाठी युवकांना आधुनिक कौशल्ये देणे ही काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हॉटेल ताज प्रेसिडेंट येथे आयोजित वाय४डी (युथ फॉर डेव्हलपमेंट) 'इंडिया @ २०४७ – पॉवर ऑफ स्किल अँड एज्युकेशन' कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, युथ फॉर डेव्हलपमेंटचे अध्यक्ष प्रफुल निकम यांच्यासह विविध उद्योग समूहांचे प्रमुख उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल. देशातील २५ कोटी नागरिक अतिदारिद्र्यातून बाहेर आले असून पायाभूत सुविधा, निवास, स्वच्छता आणि उपजीविकेच्या संधींमुळे सर्वसमावेशक विकासाला गती मिळाली आहे. महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याच्या उद्दिष्टासाठी कौशल्य विकासाला विशेष महत्त्व असल्याचे सांगून त्यांनी युवकांच्या लोकसंख्यात्मक लाभाचे रूपांतर आर्थिक शक्तीत करण्यासाठी गुणवत्तापूर्ण कौशल्य



प्रशिक्षण आवश्यक असल्याचे नमूद केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात राज्य शासनाने 'महाविस्तार' हे ॲप विकसित केले असून त्याद्वारे लाखो शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, हवामान, कीडनियंत्रण आणि सिंचनासंबंधी माहिती उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. हे ॲप विविध भाषांमध्ये कार्यरत असून तंत्रज्ञानाचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पुढील हजार दिवसांत सुमारे ७० टक्के रोजगारांचे स्वरूप बदलणार असून या बदलत्या व्यवस्थेत युवकांना सुसंगत कौशल्ये आणि ज्ञान देण्यासाठी शासन, उद्योग क्षेत्र आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.


कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांच्या माध्यमातून जलसुरक्षा, आरोग्य, कौशल्य विकास आदी क्षेत्रांत प्रभावी काम होत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही कामे तळागाळापर्यंत पोहोचविण्यात वाय४डी ने प्रभावी दुवा म्हणून भूमिका बजावली आहे. गेल्या ११ वर्षांत सामाजिक परिणामकारकतेवर आधारित विश्वासार्ह कार्य उभे केले आहे. सामंजस्य करारांपेक्षा प्रत्यक्ष कामाचा समाजावर झालेला परिणाम मोजून 'इम्पॅक्ट रिपोर्ट' सादर करण्याची संकल्पना अभिनव असून, अन्य सीएसआर भागीदार संस्थांनीही या पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

यावेळी विविध उद्योग समूहांच्या सामंजस्य करारांच्या कार्यामुळे झालेल्या परिणाम अहवालांचे प्रकाशन करण्यात आले. समाजपरिवर्तनाच्या कार्यात योगदान देणाऱ्या सर्व उद्योग समूहांचे तसेच वाय४डी संस्थेचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले.

# पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजनांना प्राधान्य द्या

■ मुंबई (दै. संध्या)

यंदा पाऊस कमी पडण्याची शक्यता लक्षात घेता पाणीटंचाई निवारणाच्या उपाययोजनांना प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे. १५ ऑगस्ट पर्यंतच्या पाणी वितरणाचे चोख नियोजन करावे तसेच, राज्यातील एकही पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही यासाठी गतीने ई-केवायसी तसेच ॲग्रीस्टॅक डाटा अपडेट करावा. राज्याचे पुनर्वसन धोरण सर्वसमावेशक व काळानुरूप करण्यासाठी नवे सुधारित धोरण जलदगतीने तयार करण्यात येईल,"अशी ग्वाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आज येथे दिली. मंत्रालयातील दालनात आयोजित मदत व पुनर्वसन विभागाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांच्यासह व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी उपस्थित होते. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले की, खरीप हंगाम २०२५-२०२६ मधील अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा 'ॲग्रीस्टॅक' डेटा सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तपासावा. ज्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही, त्यांच्यासाठी विशेष कॅम्प (शिबिरे) आयोजित करून तातडीने मदत वितरित करावी. शेतकरी आत्महत्या प्रकरणांमधील प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करून ही प्रकरणे प्राधान्याने आणि तात्काळ निकाली काढसवीत. यंदा पावसाचे कमी प्रमाण पाहता सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ ऑगस्टपर्यंतच्या पाणी वितरणाचे चोख नियोजन करावे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित कराव्यात. तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन आवश्यकतेनुसार चारा छावण्यांचे प्रस्ताव सादर करावेत. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले की, आपत्तीच्या काळात मनुष्यहानी, जखमी व्यक्ती, पशुहानी, घरगुती सामान (भांडी-कपडे), तसेच लहान दुकानदार व टपरीधारक यांना मिळणारी मदत स्थानिक प्रशासनाने शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विहीत कालावधीत करावी. दरडप्रवण गावांचे पुनर्वसन, १९७६ पूर्वीच्या प्रकल्पांमधील पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवणे आणि पूरग्रस्त भागातील गावांचे स्थलांतर यावर नवीन सुधारित धोरण लवकरच आणले जाईल.



# नागपूर कृषी उत्पन्न बाजाराला राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा दर्जा

■ पणन मंत्री जयकुमार रावल यांनी स्वीकारला पदभार

■ मुंबई (दै. संध्या)

नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबत राज्य शासनाने अधिसूचना जारी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात पणन मंत्री जयकुमार रावल यांनी पुणे येथील महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या कार्यालयातून नागपूर राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा पदभार स्वीकारला. यावेळी आ.चरण सिंह ठाकुर, पणन संचालक शरद जरे, नागपूर राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचे सचिव दिनेश चंदेल आदी उपस्थित होते. नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक चार लाख मेट्रिक टनांहून अधिक शेतमालाची उलाढाल असून देशातील अकरा राज्यांतून येथे शेतमालाची आवक होते. या सर्व बाबींचा विचार करून बाजार समितीला राष्ट्रीय महत्वाच्या बाजाराचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विदर्भातील शेतकऱ्यांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार असून नागपूरचा कृषी व्यापार राष्ट्रीय स्तरावरील मुख्य प्रवाहाशी अधिक प्रभावीपणे जोडला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात ३१ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आलेल्या सुधारणांनंतर हा निर्णय अमलात आणण्यात आला आहे. पदभार स्वीकारताना पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले, नागपूरला आंतरराष्ट्रीय स्तरावरील कृषी व्यापार केंद्र म्हणून विकसित करण्याचा संकल्प आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात हा निर्णय घेण्यात आला आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या मालाला राष्ट्रीय आणि जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देत त्यांना स्पर्धात्मक दर मिळवून देणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे. या निर्णयाचा लाभ शेतकरी, व्यापारी आणि संपूर्ण कृषी क्षेत्राला होणार आहे.राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराच्या व्यवस्थापनासाठी पणन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत कृषी व पणन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक व परराज्यातील शेतकरी प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी तसेच तज्ज्ञ सदस्यांचा समावेश असेल. नागपूर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात मुख्य बाजारासह कळमना व इतर उपबाजारांचा समावेश आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक यांसह अकरा राज्यांतून येथे शेतमालाची आवक होते. कापूस, सोयाबीन, संत्री, तृणधान्ये आणि भाजीपाला यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री येथे केली जाते. २०२४-२५ मध्ये या बाजार समितीने ६२ कोटी रुपयांहून अधिक महसूल प्राप्त केला आहे. या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्रासाठी एकच व्यापार परवाना, आंतरराज्यीय ई-व्यापाराला प्रोत्साहन तसेच इतर राज्यांतील व्यापाऱ्यांना थेट व्यापाराची सुविधा उपलब्ध होणार आहे. व्यापारी, शेतकरी आणि बाजार समिती यांच्यातील व्यवहारांमधून उद्भवणाऱ्या वादांचे निवारण ३० दिवसांच्या आत करण्यासाठी विशेष 'फास्ट ट्रॅक' यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली आहे.

# एसटी स्थानके व बसेसची दर चार तासांनी स्वच्छता : सरनाईक

## पर्यावरण दिनानिमित्त राज्यभर अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ

■ मुंबई (दै. संध्या)

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ आज मुंबईतील परळ बसस्थानक येथे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे राज्यातील बसस्थानके, एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे अधिक स्वच्छ, सुंदर व प्रवासी-अनुकूल बनविण्याचा महामंडळाचा संकल्प असल्याचे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

परळ बसस्थानकातील या कार्यक्रमात स्वच्छता मोहिमेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानके आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाचा अविभाज्य भाग आहे. दररोज लाखो प्रवासी एसटीच्या सेवांचा लाभ घेतात. त्यामुळे त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सुरू करण्यात आलेली ही राज्यव्यापी स्वच्छता मोहीम प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, आनंददायी आणि समाधानकारक बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रत्येक बसस्थानकावर स्वच्छता मोहिमेदरम्यान आढळणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या व पिशव्या संकलित करून त्यांचे पुनर्वापर (रिसायकलिंग) करण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. या प्रक्रियेतून विविध टिकाऊ व उपयुक्त उत्पादने तयार करण्यात



येतील, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, स्वच्छता ही एकदिवसीय मोहीम नसून सातत्याने राबविण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे या मोहिमेच्या अंमलबजावणीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवली जाणार असून स्वच्छतेच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रत्येक बसस्थानकावरील स्वच्छता व्यवस्थेचे नियोजनबद्ध निरीक्षण करण्यात येईल तसेच प्रवाशांकडून मिळणाऱ्या सूचना आणि अभिप्रायांनाही प्राधान्य दिले जाईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत एसटी महामंडळाने आपल्या सर्व 251 आगारांमध्ये ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार परळ आगारात विस्तारित नऊ चार्जिंग केंद्रांच्या उभारणीचे भूमिपूजन मंत्री सरनाईक यांच्या हस्ते झाले.

यावेळी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, विभागीय नियंत्रक, कर्मचारी प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सरनाईक यांनी परळ बसस्थानक परिसर, प्रवासी प्रतीक्षागृह, प्रसाधनगृहे आणि इतर सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या.

# आषाढी वारीच्या तयारीचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

**आळंदी (दै. संध्या)**



आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि वारीचे नियोजन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी गुरुवारी संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराला भेट देऊन संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली.

या बैठकीत वारी व्यवस्थापन, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षा यंत्रणा तसेच विविध विभागांमधील समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आषाढी वारी सुरक्षित, शिस्तबद्ध आणि निर्विघ्न वातावरणात पार पडावी यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

वारीदरम्यान लाखो भाविक आळंदीत दाखल होत असल्याने त्यांच्या सोयीसुविधांबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नियोजन, स्वच्छता व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी आणि सुरक्षा यंत्रणेची सज्जता यावर भर देण्यात आला.

यावेळी आळंदी नगरपरिषद व आळंदी ग्रामस्थांच्या वतीने विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी आळंदी देवस्थानचे विश्वस्त मंडळ, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, सभागृह नेते सचिन गिलबिले, माजी नगराध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी नगरसेवक डी.डी.भोसले पाटील, नगरसेविका पूजा घुंडरे, नगरसेवक गोविंदा कुऱ्हाडे, कालिदास तापकीर तसेच विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# तालुकाध्यक्षपदी हेमंत डुंबरे

नारायणगाव (दै. संध्या) : राष्ट्रीय मानवाधिकार सुरक्षा संघ, जुन्नरच्या तालुकाध्यक्षपदी हेमंत वसंतराव पाटील डुंबरे यांची सलग चौथ्यांदा निवड करण्यात आली आहे. समाजहितासाठी केलेले सातत्यपूर्ण कार्य, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी घेतलेली भूमिका आणि विविध सामाजिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग याची दखल घेत ही निवड करण्यात आल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. हेमंत डुंबरे यांनी अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्य करत नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अलीकडेच ओतूर परिसरातील रस्त्यांच्या खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातानंतर, त्यांनी रस्त्यांची त्वरित दुरुस्ती न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यांनी महावितरणच्या मनमानी कारभाराचा निषेध करत नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत आवाज उठवला होता.

## पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सासवडमध्ये

# सुरक्षा यंत्रणांचे 'मॉक ड्रिल'

**सासवड (दै. संध्या)**



आगामी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणांची सज्जता आणि समन्वय तपासण्यासाठी सासवड येथील संत सोपानकाका महाराजांच्या समाधी मंदिर परिसरात संयुक्त 'मॉक ड्रिल' यशस्वीपणे पार पडले. सासवड पोलीस, दहशतवाद विरोधी पथक, पुणे ग्रामीणचे बॉम्ब शोधक व नाशक पथक आणि आपत्कालीन यंत्रणांच्या वतीने या सरावाचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिर परिसरात तीन संशयित आरोपींनी स्फोटक सदृश वस्तू ठेवल्याची माहिती मिळाल्याचे गृहीत धरून ही मोहीम राबवण्यात आली. माहिती मिळताच सासवड पोलिसांनी तातडीने एटीएस आणि क्यूआरटी कमांडो पथकाला पाचारण केले. रायफलधारी पोलिसांनी संपूर्ण मंदिर परिसराला वेढा घालून तिन्ही संशयितांना शिताफीने ताब्यात घेतले. दरम्यान, स्फोटक सदृश वस्तू असलेली बॅग सुरक्षित स्थळी हलवून 'बीडीडीएस' पथकाने ती यशस्वीपणे निष्क्रिय करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. पालखी सोहळ्यादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि आपत्कालीन परिस्थितीत विविध यंत्रणांनी तत्परतेने कसे काम करावे, यासाठी हा सराव घेण्यात आला. यामध्ये सासवड नगरपालिकेचे अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका सेवा देखील सहभागी झाली होती.

भोर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर आणि सासवडचे पोलीस निरीक्षक कुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा सराव पार पडला. यात सासवड पोलीस ठाण्याचे अधिकारी, अंमलदार आणि विशेष पथके मोठ्या संख्येने सामील झाली होती.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पुणे-बंगळूर महामार्गावर भीषण वाहतूक कोंडी; अवजड वाहन बंद पडल्याने रांग

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील बावधन परिसरात मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर एक अवजड वाहन बंद पडल्याने शुक्रवारी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली. या घटनेमुळे पुनावळे ते बावधन दरम्यान तब्बल १० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असून साताराकडे जाणारी वाहतूक जवळपास पूर्णपणे ठप्प झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बावधन परिसरात महामार्गावर एक अवजड वाहन अचानक बंद पडले. त्यामुळे महामार्गावरील वाहतुकीचा वेग मंदावला आणि काही वेळातच वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली. वाहनांची संख्या मोठी असल्याने कोंडीचा परिणाम पुनावळेपर्यंत जाणवला. या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका कोल्हापूर, सांगली, सातारा, कराड, शिरवळ आणि दक्षिण महाराष्ट्राकडे जाणाऱ्या प्रवाशांना बसत आहे. अनेक वाहनचालकांना तासन्तास महामार्गावर अडकून राहावे लागत असून प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणात वाढला आहे. विशेषतः आठवड्याच्या शेवटी आपल्या गावी किंवा पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक असल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बंद पडलेले वाहन बाजूला करण्याचे प्रयत्न सुरू असून वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांकडून विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र वाहनांची लांबलचक रांग आणि मोठ्या प्रमाणावरील वाहतुकीमुळे पोलिसांचीही चांगलीच तारांबळ उडाली आहे. दरम्यान, पुणे-कोल्हापूर मार्गावर वाहतूक कोंडीची समस्या नवी नसून या महामार्गावर नियमितपणे अशा घटना घडत असतात. वाढती वाहतूक, रस्त्यावरील कामे, अपघात किंवा अवजड वाहने बंद पडणे यामुळे प्रवाशांना वारंवार मनस्ताप सहन करावा लागतो. विशेषतः शनिवार-रविवार आणि सुट्टीच्या कालावधीत या मार्गावर वाहनांची संख्या वाढल्याने कोंडीचे प्रमाण अधिक तीव्र होत असल्याचे चित्र पाहायला मिळते.

### पुणे शहरातील लाखो नागरिकांना 21 दिवसांपासून दूषित पाणी पुरवठा

पुणे (दैनिक संध्या) : नगर रस्ता, विश्रांतवाडी परिसरातील लाखो नागरिकांना गेल्या २१ दिवसांपासून दूषित पाणी पुरवठा होत आहे. महापालिकेकडे तक्रार करूनही पिवळसर पाणी पुरवठा होत आहे. याचे नेमके कारण काय ? पाणी पुरवठा विभागाला अद्याप समजलेले नाही. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पुणे शहरातील संजय पार्क, संपूर्ण विमाननगर, म्हाडा कॉलनी, एस.आर.ए. भाग, कुलकर्णी गॅरेज भाग, यमुनानगर, राजीव गांधी नॉर्थ व साउथ, विश्रांतवाडीचा काही भाग, धानोरी, लोहगाव, चंदननगर, खराडी, नगर रस्ता, वडगाव शेरी या भागाला भामा आसखेड धरणातून पाणी पुरवठा केला जातो. या भागात गेल्या तीन आठवड्यापासून पिवळसर पाणी येत असून, त्याला दुर्गंधीही येत आहे. याची पाणी पुरवठा विभागाकडे तक्रार केल्यानंतर प्रयोगशाळेत पाणी तपासण्यासाठी पाठविण्यात आले होते. हे पाणी पिण्यास योग्य असल्याचा निर्वाळा देण्यात आला, पण पाणी पिवळसर का होत आहे याचे कारण महापालिकेला शोधता आले नाही. नगरसेविका नंदिनी धेंडे, माजी नगरसेवक डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन हा प्रकार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आणला आहे. नंदिनी धेंडे म्हणाल्या, नळाला पाणी आल्यानंतर सुरुवातीला अर्धा तास प्रचंड गढूळ पाणी येत आहे, त्यानंतर स्वच्छ पाणी येत असले तरी त्याला पिवळसर रंग कायम आहे.

# मोदी सरकारची बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आढावा बैठक

**नारायणगाव (दै. संध्या)**




हॉटेल गोविंद गार्डन येथे मोदी सरकारची पूर्ण होत असल्याबद्दल आढावा बैठक संपन्न झाली. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या ऐतिहासिक कामगिरीची १२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, "मोदी सरकारची १२ वर्षे – विश्वास, विकास व जनकल्याणाची" या कार्यक्रमांतर्गत पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या संघटनात्मक संपर्क दौऱ्याअंतर्गत पिंपरी-चिंचवड व पुणे उत्तर (मावळ) जिल्ह्याची विभागीय आढावा बैठक आज मोठ्या उत्साहात पार पडली.

'राष्ट्र प्रथम' या मूल्याधिष्ठित संकल्पनेतून सातत्याने सेवा देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, गरीब, शोषित आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी तसेच 'विकसित भारत' या ध्येयपूर्तीसाठी सरकार वेगाने पुढे जात आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष मा.नितीन नबीनजी यांच्या नेतृत्वात व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, या १२ वर्षांच्या उल्लेखनीय कार्याचा आढावा घेत जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या निमित्ताने आयोजित आढावा बैठकीत सरचिटणीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेश (विभाग समन्वयक) आ.निरंजनजी डावखरे, विभाग सहसंयोजक मा.विक्रमजी देशमुख, अभियान प्रदेश सहसंयोजक आ.विक्रमजी पाचपुते, यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले यावेळी मा.खासदार रणजीतजी सिंह नाईक निंबाळकर, मा.खासदार अमरजी साबळे, आमदार महेशदादा लांडगे, आमदार शंकरशेठ जगताप, माजी आमदार अश्विनीताई जगताप, भरतजी पाटील व पिंपरी चिंचवड शहर व पुणे जिल्हा उत्तरचे सर्व प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप दादा कंद व भाजपा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष, मा.शत्रुघ्न (बापू) काटे, यांनी भूषवले.

या विभागीय आढावा बैठकीत संघटनात्मक बळकटीकरण, आगामी कार्यक्रमांची रूपरेषा आणि जनसंपर्काच्या प्रभावी अंमलबजावणीवर सखोल चर्चा झाली. विश्वास, विकास आणि जनकल्याण या त्रिसूत्रीवर आधारित मोदी सरकारच्या कार्याचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा दृढ संकल्प या बैठकीतून व्यक्त झाला.

# अहिल्यादेवी जयंती उत्सवात दोन गटात हाणामारी

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवात जुन्या वादातून दोन गटात लोखंडी रॉड, लाकडी दांडके आणि दगडांनी तुंबळ हाणामारी झाली आहे. यामध्ये ५ जण जखमी झाले आहेत. याप्रकरणी ७ जणांवर परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर घटना हवेली तालुक्यातील तरडे येथील गवतेमळा परिसरात ३१ मे रोजी रात्रीच्या सुमारांस घडली आहे. याप्रकरणी चंपक उत्तमराव गवते (वय ४०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून समीर प्रभाकर दाभाडे (अंदाजे वय २६), प्रभाकर दत्तात्रय दाभाडे (अंदाजे वय ५२) व अभिषेक प्रभाकर दाभाडे (अंदाजे वय २७ सर्व रा. गवतेमळा, तरडे ता. हवेली, जि. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर अभिषेक प्रभाकर दाभाडे (वय २७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चंपक उत्तम गवते, आप्पा दिपक गवते, रूपक उत्तम गवते) व दिपक उत्तम गवते (सर्व रा.तरडे, ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत फिर्यादी चंपक गवते हे अहिल्यादेवी जयंतीचा कार्यक्रम आटोपून ३१ मे रोजी रात्री कुटुंबासह घरी परतत होते. तेव्हा समीर दाभाडे याने गवते अडवून धमकी दिली. गावकऱ्यांनी मध्यस्थी करून वाद मिटवला. मात्र, काही वेळानंतर समीर दाभाडे, प्रभाकर दाभाडे आणि अभिषेक दाभाडे हे गवते यांच्या घरासमोर आले व शिवीगाळ करत वाद घातला. समीर दाभाडे याने लोखंडी रॉडने चंपक गवते यांच्यावर हल्ला केला. त्यांना वाचवण्यासाठी आलेल्या दिपक गवते, सिता गवते आणि इतर कुटुंबीयांनाही मारहाण करण्यात आली.

# अनधिकृत बांधकाम केलेप्रकरणी उद्योजकावर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वारंवार नोटीस बजावूनही अनधिकृत बांधकाम सुरूच ठेवल्याप्रकरणी एका विकासकाविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन व निष्कासन विभागातील शाखा अभियंता (कंत्राटी) प्रणव दिलीप डेंगळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उद्योजक हेमंत हाडके (रा. लोणी काळभोर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु पूर्व हवेलीत शेकडो अनधिकृत बांधकामे आणि मोठे प्रकल्प सुरू असल्याची चर्चा असून, त्या विकासकांवरही पीएमआरडीए कारवाई करणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कदमवाकवस्ती येथील गट क्रमांक ४७७ मधील बांधकामाबाबत अशोक दिनकर खोले यांनी पीएमआरडीएकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने २७ मार्च २०२६ रोजी अधिकाऱ्यांनी स्थळपाहणी केली असता संबंधित ठिकाणी हाडके यांच्या मालकीचे बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले.

# पुजारी व कर्मचारी वर्गाने एकजुटीतून जपली माणुसकी

## अडचणीत सापडलेल्या नागपूरच्या भाविकाला दिला मदतीचा हात

**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी येथे काल दिनांक ३ जून रोजी सायंकाळी अचानक आलेल्या पावसामुळे भाविकांची मोठी धांदल उडाली. या गोंधळाच्या परिस्थितीत नागपूरहून आलेल्या एका भाविकाचे पैसे हरवले. त्यामुळे त्याच्यासमोर व त्याच्या कुटुंबासमोर घरी परत जाण्याचा आणि पुढील प्रवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. आर्थिक मदतीचा कोणताही पर्याय नसल्याने तो भाविक आणि त्याचे कुटुंब चिंतेत व घाबरलेल्या अवस्थेत होते.

ही बाब तेथील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ पुजारी वर्गाशी संपर्क साधला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पुजारी व कर्मचारी वर्गाने एकत्र येत आपापसांत वर्गणी गोळा केली. या माध्यमातून संबंधित भाविकाच्या कुटुंबाला प्रवासासाठी आवश्यक आर्थिक मदत देण्यात आली. तसेच रस्त्यामध्ये जेवण व इतर आवश्यक खर्चाचीही व्यवस्था करण्यात आली. एकीकडे विविध कारणांमुळे जेजुरीचे नाव बदनाम करण्याचे प्रयत्न होत असताना, दुसरीकडे येथील पुजारी व कर्मचारी वर्गाने दाखविलेली ही माणुसकी समाजासमोर एक आदर्श उदाहरण ठरली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून सर्व स्तरांतून या कार्याचे कौतुक केले जात आहे.

सोशल मीडियावरून ही बाब समजल्यानंतर भारतीय जनता पार्टी, जेजुरी शहरच्या पदाधिकाऱ्यांनी तत्काळ दखल घेत पुजारी वर्ग व कर्मचारी वर्गाचा लेखी अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला व त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी भाजप जेजुरी शहरचे सरचिटणीस सदानंद बारकाई, सचिन मोरे, स्वानंद अत्रे, ट्रस्टचे कर्मचारी दादा खोमणे, बाबा खोमणे, कल्याण चव्हाण, आशिष जावळेकर तसेच पुजारी वर्गातील संतोष बारभाई, दत्ताकाका सातभाई, अनिरुद्ध आगलावे, सचिन भोसले, प्रशांत बारभाई आदी उपस्थित होते.

या प्रसंगातून जेजुरीतील पुजारी व कर्मचारी वर्गाने केवळ सेवा नव्हे तर संकटात सापडलेल्या भाविकांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेली माणुसकीची परंपरा जपल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# लहान वयातच मुलांना व्यायामाची व खेळाची आवड लागावी

**नारायणगाव (दै. संध्या)**



नारायणगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत कुस्ती प्रशिक्षण शिबिराच्या समारोप कार्यक्रमात आमदार अतुल बेनके यांनी कुस्ती हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि परंपरेचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले. लहानपणापासून मुलांमध्ये व्यायाम, फिटनेस आणि खेळांची आवड निर्माण झाली तर भविष्यात राज्य व देशासाठी उत्कृष्ट खेळाडू घडू शकतात, असे त्यांनी नमूद केले. कुस्ती हा केवळ एक खेळ नसून ती महाराष्ट्राची शौर्य, परंपरा आणि समृद्ध सांस्कृतिक वारश्याचे प्रतीक आहे. त्यामुळे गावोगावी भरविल्या जाणाऱ्या कुस्ती स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील युवा पैलवानांना प्रोत्साहन मिळते आणि त्यांना एक हक्काचे व्यासपीठ प्राप्त होते. महाराष्ट्राच्या मातीतल्या या पारंपरिक खेळाचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज असून, यामुळे तरुणांमध्ये शिस्त आणि सकारात्मक जीवनशैली रुजते. राजमुद्रा सामाजिक सेवा संस्था, नारायणगाव आणि जुन्नर तालुका कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते १६ वयोगटातील मुला-मुलींसाठी एक महिन्याचे विनामूल्य कुस्ती प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रशिक्षकांनी कुस्तीतील विविध डावपेच, शारीरिक तंदुरुस्ती, संतुलित आहार, व्यायामाचे महत्त्व आणि शिस्त याबाबत माहिती दिली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष चव्हाण, भाजप युवा मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष गणेश कवडे, राजमुद्रा सामाजिक सेवा संस्थेचे अध्यक्ष आकाश नलावडे कार्याध्यक्ष रोहित वाबळे, नारायणगावचे सरपंच योगेश पाटे, वारूळवाडीचे सरपंच विनायक भुजबळ, सचिव ऋषिकेश औटी, राष्ट्रवादी काँग्रेस जुन्नर तालुका अध्यक्ष विकास दरेकर, ड.शिवदास तांबे, आशिष माळवदकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरातील विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. शिबिरामध्ये अनुभवी प्रशिक्षक सुरेश काकडे आणि विलास कदम यांनी विद्यार्थ्यांना कुस्तीतील विविध डावपेच ,शरीरिक तंदुरुस्ती, संतुलित आहार ,व्यायामशास्त्र, शिस्त आणि खेळाडूवृत्ती यांचे सखोल मार्गदर्शन केले.

डिजिटल युगात मुलांचे आरोग्य जपण्यासाठी व्यायाम, कुस्ती आणि पारंपरिक खेळांविषयी आवड निर्माण होणे गरजेचे असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहित वाबळे यांनी केले. आकाश नलावडे यांनी उपस्थित असलेल्यांचे स्वागत केले तर सचिव ऋषिकेश औटी यांनी आभार मानले ,वैभव दरंदळे, संदेश केदारी ,अतिश बुचके आणि कुणाल आवाळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

